रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २८८
www.ramprahar.com

मंगळवार, ६ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## केंद्राकडून सर्व राज्यांना मॉक ड्रिल घेण्याचे निर्देश



**नवी दिल्ली** : पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव खूप वाढला आहे. भारताने पाकिस्तानविरुद्ध अनेक महत्त्वाची पावले उचलली आहेत. भारताच्या कठोर कारवाईमुळे पाकिस्तानी सरकार आणि लष्कर प्रचंड तणावाखाली आहे. अशातच आता केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यांना प्रभावी नागरी सुरक्षेसाठी ७ मे रोजी मॉक ड्रिल आयोजित करण्यास सांगितले आहे. हे मॉक ड्रिल हवाई हल्ल्याशी संबंधित असेल. राज्यांना हवाई हल्ल्याच्या इशारा देणारे सायरन वाजवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जेव्हा हल्ला होतो, तेव्हा सूचना देण्यासाठी सायरन वाजवले जातात. सर्व राज्यातील सुरक्षा यंत्रणा सज्ज आहे की नाही या अनुषंगाने चाचपणी करण्यासाठी या सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती सांगितली जात आहे.

अंतरंग

खालापुरातील धामणी येथे शॉर्टसर्किटने वाड्याला आग/२

नवी मुंबईत अनधिकृत बांधकाम, झोपड्यांवर कारवाई/६

वनडे, टी-२०मध्ये टीम इंडिया नंबर वन/८

# शेकाप नेते जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांचा पक्षाला अखेरचा लाल सलाम!

## समर्थकांसह उद्या करणार भाजपमध्ये प्रवेश

**पनवेल : वार्ताहर**

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते व पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आणि समर्थकांनी शेकापसह महाविकास आघाडीच्या आठमुठेपणामुळे भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतची घोषणा त्यांनी सोमवारी (दि. ५) पत्रकार परिषदेत केली. येत्या ७ मे रोजी स्व. जनार्दन भगतसाहेबांच्या पुण्यतिथी कार्यक्रमानिमित्त हा पक्षप्रवेश कार्यक्रम होणार आहे. आधीच गाळात चाललेल्या शेकापसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.



पत्रकार परिषदेला जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रेंसह जिल्हा चिटणीस गणेश कडू, कार्यालयीन चिटणीस जितेंद्र म्हात्रे, माजी नगराध्यक्ष अनुराधा ठोकळ, माजी नगरसेवक सुनील बहिरा, रवींद्र भगत, माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज–म्हात्रे, पुष्पलता मढवी, सारिका म्हात्रे, सुरेखा मोहोकर, उद्योगपती हरिश्चंद्रसिंघ सग्गु, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, विलास मोहकर, युवा नेते जॉर्ज, एल.टी. पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

याबाबत माहिती देताना जे.एम. म्हात्रे यांनी सांगितले की, पनवेल, उरण, खालापूर विभागातील शेकापच्या प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक आज पनवेलमधील कार्यालयात घेतली असता सर्वांनी मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचा आग्रह धरला तसेच या संदर्भात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याशी चर्चा केल्यावर भाजपमध्ये प्रवेश करण्याचे आम्ही निश्चित केले असून येत्या ७ मे रोजी स्व. जनार्दन भगतसाहेबांच्या पुण्यतिथी कार्यक्रमानिमित्त समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश करणार आहोत.

अपेक्षित प्रश्नांची योग्य उत्तरे मिळत नसल्यामुळे महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय जे.एम. म्हात्रे यांनी गेल्या आठवड्यात घेतला होता. त्यानंतर शेकापच्या धोरणावरही नाराजी व्यक्त करून समर्थकांची बैठक पनवेल येथील गुरूशरणम कार्यालयात बोलावली होती. (पान २ वर..)

# बारावीचा निकाल ९१.८८ टक्के

## यंदाही मुलींची बाजी; कोकण विभाग राज्यात अव्वल

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा एकूण निकाल ९१.८८ टक्के लागला आहे. निकालात यंदाही मुलींनी बाजी मारली आहे, तर नऊ विभागीय मंडळांमध्ये कोकण विभाग अव्वल ठरला आहे.

या परीक्षेस विज्ञान, कला, वाणिज्य, व्यवसाय अभ्यासक्रम व आयटीआय या शाखांसाठी मिळून १४,२७,०८५ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,१७,९६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले, तर १३,०२,८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व विभागीय मंडळांमधून



कोकण विभागाचा निकाल ९६.७४ टक्के इतका सर्वाधिक आहे.

निकालात सहा लाख २५ हजार ९०१ मुली, तर सहा लाख ७६ हजार ९७२ मुले उत्तीर्ण झाली. मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.५८ टक्के आणि मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.५१ टक्के आहे.

### रायगड जिल्ह्याचा निकाल ९४.६६ टक्के

**अलिबाग** : बारावीच्या परीक्षेत रायगड जिल्ह्याचा निकाल ९४.६६ टक्के लागला आहे. मुंबई विभागात रायगड जिल्हा अव्वल ठरला आहे. जिल्ह्यात सर्वात जास्त ९९.४८ टक्के निकाल तळा तालुक्याचा आहे. उत्तीर्ण होण्यात मुलींनी बाजी मारली असून तळा तालुक्यातील १०० मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

जिल्ह्यातील २९ हजार ४९३ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी अर्ज भरले होते. त्यापैकी २९ हजार ४१७ विद्यार्थी परीक्षेला बसले. यातील २७ हजार ८४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. जिल्ह्यात तळा तालुक्याचा निकाल ९९.४८, म्हसळा ९६.६२, कर्जत ९६.३८, महाड ९६.१४, माणगाव ९६.०६, पनवेल ९६.०३, अलिबाग ९५.५६, रोहा ९५.२९, उरण ९३.८५, पेण ९२.९९, पोलादपूर ९१.१६, मुरूड ९०.६९, खालापूर ९०.४८, सुधागड ८५.३३ आणि श्रीवर्धन तालुक्याचा निकाल ८४.०९ टक्के लागला आहे.





**मुंबई : ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे संपादित ‘महाराष्ट्र ६५’ या पुस्तकाचे प्रकाशन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. या वेळी राज्य सहकारी बँकेचे प्रशासक बाळासाहेब अनास्कर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ‘पानिपत’कार विश्वास पाटील, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, माजी अध्यक्ष नरेंद्र वाबळे आदी मान्यवर उपस्थित होते.**

## निवडक

### दहशतवादाविरोधात रशियाचा भारताला पाठिंबा

**नवी दिल्ली** : पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी सोमवारी (दि. ५) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन करून दहशतवादविरोधी लढाईत रशिया भारताच्या पूर्ण पाठिशी असल्याचे म्हटले आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने याबाबतची माहिती दिली.

### भारतात घुसखोरी करणाऱ्या पाकिस्तानी व्यक्तीला अटक

**चंदिगड** : दोन दिवसांपूर्वी पंजाब पोलिसांनी दोन पाकिस्तानी गुप्तहेरांना अटक करत मोठी कारवाई केली आहे. यानंतर आता पंजाब सीमेवरून एका व्यक्तीने भारतात प्रवेश करत घुसखोरीचा प्रयत्न केला. या पाकिस्तानी नागरिकाला अटक करण्यात आली आहे.

# कर्नाळा खिंडीत बस उलटून प्रवाशाचा मृत्यू; २४ जण जखमी

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतली जखमींची भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**


कर्नाळा खिंडीत रविवारी रात्री खासगी प्रवासी बस उलटून एका प्रवाशाचा मृत्यू आणि अन्य २४ प्रवासी जखमी झाले आहेत. सर्व जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी जखमी प्रवाशांची भेट घेऊन विचारपूस केली.

ओमकार ट्रॅव्हल्सची ही बस मालाडहून कणकवलीला जात होती. या बसमध्ये एकूण ४९ प्रवासी होते. कर्नाळा खिंडीत रात्री ११च्या सुमारास बस उलटली. या अपघातात अमोल कृष्णा तळवडेकर (वय ३०, रा.कोंडाये, जि. रत्नागिरी) यांचा मृत्यू झाला, तर २४ जण जखमी झाले. जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी सकाळी एमजीएम रुग्णालयास भेट देऊन अपघातग्रस्तांची विचारपूस केली तसेच नातेवाईकांशी संवाद साधत जखमींच्या प्रकृतीबाबत माहिती घेतली. जखमींच्या उपचारासाठी आर्थिक मदतीची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# फरार माओवादी प्रशांत कांबळे अखेर जाळ्यात

**पुणे, चौक : प्रतिनिधी**



गेल्या १५ वर्षांपासून फरार असलेला माओवादी प्रशांत जालिंदर कांबळे उर्फ लॅपटॉप याला दहशतवादविरोधी पथकाच्या पुणे शाखेने अटक केली आहे.

पुणे एटीएसने सापळा रचून प्रशांत कांबळेला पिंपरी चिंचवड परिसरातील चऱ्होली येथून ताब्यात घेतले. तो खोपोली परिसरात स्वतःचे अस्तित्व लपून वास्तव्य करीत होता. त्याला मुंबई सत्र न्यायालयाने १३ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# अक्षय शिंदे एन्काउंटरप्रकरणी सुप्रीम कोर्टाचा सरकारला दिलासा

■ नव्याने एफआयआरची गरज नाही

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कल्याणच्या शाळेतील चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या अक्षय शिंदे एन्काउंटरप्रकरणी नव्याने एफआयआर दाखल करायची गरज नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे राज्य सरकारला दिलासा मिळाला आहे.

अक्षय शिंदे एन्काउंटरप्रकरणी सोमवारी (दि.५) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ही याचिका निकाली काढण्यात आली आहे.

एसआयटी पोलीस महासंचालकांच्या देखरेखीखाली काम करेल. तक्रारदारांनी (अक्षय शिंदे कुटुंबीय) स्वतः याचिका मागे घेतली आहे. त्यामुळे त्यांना नोटीस जारी करण्याची आवश्यकता नाही असे न्यायालयाने म्हटले आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात आम्ही बदल करीत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे सरकारला दिलासा मिळाला आहे.



# भाजप सांस्कृतिक महोत्सवात ग्रुप डान्स स्पर्धा रंगली

**खारघर : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून खारघर येथील गावदेवी मैदानावर आयोजित भाजप सांस्कृतिक महोत्सवाचा रंगारंग समारोप झाला. शेवटच्या दिवशी आयोजित ग्रुप डान्स स्पर्धेने प्रेक्षकांची मने जिंकली.

डान्स स्पर्धेत नृत्याकार लल्लाटी या ग्रुपने प्रथम क्रमांक पटकावला. नृत्य आराधना ग्रुपने द्वितीय, तर एमएनआर स्कूल ऑफ एक्सिलन्सने तिसरा क्रमांक मिळवला. नृत्य कला डान्स अकॅडमी व रेज रियुनिटेड यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर शहराध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, माजी नगरसेविका संजना कदम, नेत्रा पाटील, आरती नवघरे, हर्षदा उपाध्याय, सरचिटणीस दीपक शिंदे, कीर्ती नवघरे, महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, संध्या शारबिद्रे, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अक्षय लोखंडे, शोभा मिश्रा, निलम विसपुते, शैलेंद्र त्रिपाठी, अनिल साबणे, तुकाराम कंटाळे, सीमा खडसे, दुर्गादेवी अंजुरे, समीर कदम, अमर उपाध्याय, प्रिया दळवी, अनिता जाधव, केतन नवघरे, निर्मला यादव, साहिल बोढई, अमित बोढई, नवलकुमार मोरे, संजय मुळीक, जगन्नाथ भानत, आदेश भोईर, मनोहर नक्का, जुमा चक्रवर्ती, अंकिता वारंग, गायत्री दुबे, विद्या येवले, भारती बांदेकर, बिंदू सुरीला, माया सिंग, सोमा बिस्वास, मीनाक्षी डांगे, सुनीता देशमुख, सपना नाईक, संध्या पुजारी, आशा पवार, अनिता द्विवेदी, रत्नमाला पाटील, सुनंदा देसाई, संदीप माघाडे, छाया बाबर, प्रवीण बेरा, आदित्य हातगे, सार्थक दोरूगडे, प्रथम पाटील, योगेश पाटील, हार्दिक पटेल, यश पवार, बंटी ढाकसे, अभिजीत सरकार, वैभव शेजवळ, ध्रुव गजरा, दुर्गा बन्सल उपस्थित होते.



## अधिक गतिमान, प्रशासनासाठी
# टेक वारी उपक्रम मार्गदर्शक
### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रशासन काळानुरूप बदल स्वीकारणारे असेल तर लोकांना अधिक गतिमान, पारदर्शक व चांगल्या सेवा मिळू शकतात. सामान्य प्रशासन विभागाने आयोजित केलेला 'टेक वारी': महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' हा उपक्रम राज्यातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रशासकीय क्षमता विस्तारण्यासाठी मार्गदर्शक ठरेल. आपण बदलांचा केवळ स्वीकार करत नसून बदलाचे नेतृत्व करत असल्याचा संदेश 'टेक वारी' उपक्रमाच्या माध्यमातून जाईल, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.



मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगण येथे टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीकचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार, महाराष्ट्र सदनच्या आयुक्त आर.विमला, प्रसिद्ध वक्ते प्रभु गौर गोपालदास यासह ज्येष्ठ सनदी अधिकारी, मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ५ ते ९ मे दरम्यान टेक वारी अंतर्गत हा प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रसिद्ध वक्ते प्रभु गौर गोपाल दास यांच्या मार्गदर्शनाचा फायदा सर्वांनाच होईल. ब्लॉकचेन, इंटरनेट ऑफ थिंग्ज्, सायबर सुरक्षा, डिजिटल फायनान्स 'तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासनाचे परिवर्तन' 'कृत्रिम बुद्धिमत्ता'', विकसित महाराष्ट्रासाठी फ्रंटियर टेक' अशा क्षेत्रातील तज्ज्ञ विविध मार्गदर्शन सत्रांद्वारे हे विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगणार आहेत. काळानुरूप बदल सगळ्यांनी स्वीकारून प्रशासन अधिक गतिमान करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, टेक-वारीमध्ये तणाव व्यवस्थापन, संगीत थेरपी, ध्यानधारणा, कार्य-जीवन समतोल या विषयांवरील मार्गदर्शन सत्रे आयोजित केली आहेत. यामुळे संतुलित व सुदृढ शासकीय कर्मचारी वर्ग घडविण्यास मदत होईल.

माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या माध्यमातून लोकाभिमुख काम करणारे महाराष्ट्र राज्य प्रत्येक क्षेत्रात पुढे आहे. 'आय गॉट' वर प्रशिक्षण पूर्ण करण्यात आपले राज्य पहिल्या तीनवरून प्रथम क्रमांक प्राप्त करेल. प्रशासनाने अधिक गतीमान सेवा देण्यावर भर द्यावा. आपल्या प्रत्येकाच्या कामाच्या मूल्यमापनातूनच एकंदरीत कामाचे मोजमाप होत असते महाराष्ट्र प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहे. प्रत्येक बदलाला सामोराही जात आहे. प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी देखील हे बदल स्वीकारून आपले काम अधिक गतीमान पद्धतीने करतील, असा विश्वास ॲड. शेलार यांनी व्यक्त केला.

'टेक-वारी' उपक्रम नाविन्यपूर्ण असून त्याचा लाभ नक्कीच सर्व अधिकारी घेतील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# धामणी येथे विद्युत लाईनच्या शॉर्टसर्किटमुळे वाड्याला आग

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील धामणी येथे उमेश चिले या शेतकरी कुटुंबाच्या गुरांसाठी पावसाळ्याचे नियोजन म्हणून जवळपास १५ हजाराच्यावर गुरांचे वैरण साठवुन ठेवलेल्या वाड्याला विद्युत लाईनी मध्ये शॉट सर्किट होउन शेडला आग लागली. या आगीत पेंडा, बैलगाडी,नांगर- फली यासह शेतीचे सर्व अवजारे जळून खाक झाले आता गुरांना रोजच्या खाण्याचे वैरण ही शिल्लक राहिले नसल्याने या शेतकरी कुटुंबावर मोठे संकट ओडावले आहे .



धामणी गावात गवळी समाजच्या परंपरेनुसार उमेश सटुराम चिले हे शेती व्यवसायला जोड धंदा म्हणून दुग्ध व्यवसाय करतात. या कुटुंबाकडे १६ गुरे आहेत . या गुरांसाठी पावसाळ्यात वैरण साठवणूक ठेवण्यासाठी गोठ्या शेजारी पत्र्याचे शेड बांधून कंपाऊंडच्या आत १५ हजाराच्या वर पेंड्यांच्या गुंड्या साठवून ठेवल्या होत्या. या शेड मध्ये बैलगाडी व शेतीची अवजारे ठेवली होती.

या शेडच्या वरून विद्युत लाईन गेल्याने २ मे रोजी सायंकाळी खालापूर विद्युत मंडळाच्या कर्मचारी वर्गाने या लाईनला अडचण ठरणारे फांद्या छाटल्या त्यामुळे येथील विजेच्या तारा खाली लोंबकळत होत्या. ३ मे रोजी दुपारच्या दरम्यान शॉट सर्किट झाल्याने आगीच्या ठिणग्या या वाड्यावर पडल्याने या शेड मधील पेंड्यांनी आग पकडली. या आगीत शेड मध्ये व बाहेर १५ हजाराच्या पेक्षा जास्त गुरांसाठी असलेला पेंडा ७० हजार किमतीचा व बैलगाडी अंदाजे किंमत २५ हजार रुपये तसेच नांगर फळी यासह अन्य शेतीच्या मशागतीसाठी ठेवलेली अवजारे जळून खाक झाली आहेत. त्यामुळे शेतकरी कुटुंबावर मोठे संकट ओढावले आहे. त्यामुळे या घटने बाबत विद्युत मंडळाचे अधिकारी ,तलाठी यांना माहिती देऊन भरपाई ची अपेक्षा असल्याचे सांगितले आहे .

# पोलादपूर तालुक्यात आदित्य सावंत कला शाखेत प्रथम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ मुंबई विभागातून विद्यामंदिर पोलादपूरच्या आदित्य राकेश सावंत कला शाखेत ९२ टक्के गुण मिळवून तालुक्यात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. पोलादपूर तालुक्यातील कापडे येथे स्नेहा जनार्दन निकम ही ७०.५० टक्के गुण मिळवून श्री वरदायिनी उच्च माध्यमिक विद्यालय येथे प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

कला शाखेमध्ये आदित्य राकेश सावंत हा ९२ टक्के गुणांनी पोलादपूर तालुक्यात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. द्वितीय क्रमांक ६८.२३ टक्के गुण मिळवणाऱ्या आनंदी गजानन चिकणे हिने तर तृतीय क्रमांक६८ टक्के गुण मिळवणाऱ्या दिव्या उमेश पवार हिने प्राप्त केला.

वाणिज्य शाखेमध्ये वेदिका विजय शिंदे हिने ८७.१७ टक्के गुण मिळवून प्रथम, साहिल अनिल पालकर याने ८६.१७ मिळवून द्वितीय पियुष विठ्ठल पवार याने ८०.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

विज्ञान शाखेमध्ये सानिका राजेश शिर्के हिने ६९ टक्के गुण मिळवून प्रथम, साक्षी विजय जाधव हिने ६५ टक्के गुण मिळवून द्वितीय हर्षदा भारत तांबे हिने ६४.६७% मिळून तृतीय क्रमांक प्राप्त केला. विद्यामंदिर पोलादपूर मध्ये ५० विद्यार्थ्यांपैकी ४७ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने ९४ टक्के निकाल लागला आहे.

कापडे बुद्रुक येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये वाणिज्य शाखेची स्नेहा जनार्दन निकम हिने ७०.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. भक्ती सकपाळ हिने ६७.५० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर सुहास म्हस्के याने ६५.८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. वाणिज्य विभागात ५० विद्यार्थी एच एस सी परीक्षेला बसले होते व ते सर्व उत्तीर्ण झाल्याने शंभर टक्के निकाल लागला आहे.

विज्ञान विभागामध्ये प्राजक्ता विलास कुमठेकर हिने ६४ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. आकांक्षा सकपाळ हिने ६०.५० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर कळंबे हिने ६७.१७% गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. विज्ञान शाखेमध्ये ४५ विद्यार्थ्यांपैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने काय झालं बेटा ९७.७७ टक्के निकाल लागला.

कला शाखेमध्ये काजल दातखिळे हिने ७७.३३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला तर अमर घाडगे याने ६३.८३ टक्के गुण मिळवून द्वितीय आणि अक्सा अहमद तिवडेकर हिने ६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. २४ विद्यार्थ्यांपैकी आठवा विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने ७५ टक्के निकाल लागला आहे.

## मोर्बा ज्युनिअर विज्ञान कॉलेजचा बारावी परीक्षा निकाल ९५.६० टक्के

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावी प्रमाणपत्र परीक्षेत माणगाव तालुक्यातील मोर्बा सोशल सोसायटीच्या मोर्बा ज्युनिअर विज्ञान कॉलेजचा बारावी परीक्षेचा निकाल ९५.६० टक्के लागला असून कु. अजैन अब्दुलगणी बंदरकर या विद्यार्थ्याने ८४.६७ टक्के म्हणजेच ६०० पैकी ५०८ इतके गुण संपादन करून कॉलेजमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या कॉलेजमधून एकूण ९१ विद्यार्थी बारावी परीक्षेला बसले होते त्यापैकी ८७ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. या कॉलेजचा निकाल दरवर्षी उंचावत असल्याने पालकवर्गांमधे विशेष आनंदाचे वातावरण आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.सैफुद्दीन धनसे,उपाध्यक्ष मोहसीन राऊत,सेक्रेटरी अस्लम राऊत, यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## सर एस.ए. हायस्कूल व स्व. म.ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य विभागाचा हर्षल खंडागळे सर्वप्रथम

**मुरुड : प्रतिनिधी**

सर. एस. ए.हायस्कूल मध्ये वाणिज्य शाखेने वरचष्मा ठेवला असून या शाखेतील हर्षल प्रकाश खंडागळे याने ७६.६७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. या वेळी या हायस्कूल मधूनद्वितीय- माधवी गणेश मिसाळ ७५.००% तृतीय- सिद्धांई अनिल भेरले ७०.५०% गुण प्राप्त केले आहेत. कला शाखेतूनप्रथम- रागिणी नारायण पावशे ७१.६७% द्वितीय- मानसी परशुराम मिसाळ ६३.५०%तृतीय- वरद दीपेश रावजी ६१.००% गुण प्राप्त केले आहेत.बँकिंग शाखा प्रथम- उर्वशी दिनेश कोळेकर ७७.००%द्वितीय- निहाली विजय वाघ ६७.३३% तृतीय- प्रीती भरमा जयस्वाल ६३.००% गुण प्राप्त केले आहेत.या हायस्कूल मधूनकला शाखेतून ७४ पैकी ५३ पास होऊन या शाखेचा निकाल हा ७१.६२% लागला आहे. वाणिज्य शाखेमधून १३६ पैकी १२९ पास ९४.८५% एवढा निकाल लागला आहे.बँकिंग शाखेमधून ६ पैकी ५ पाच ८३.३३% एवढा निकाल लागला आहे.

# वणवे विझवणाऱ्या नागरिकांचा वनविभागातर्फे सन्मान

**सुधागड : प्रतिनिधी**

सुधागड वनपरिक्षेत्रातील काही जांबाज नागरिकांनी जीवाची बाजी लावून वणवे विझवण्यासाठी मोलाचे योगदान दिले. या नागरिकांनी वणवे विझवण्यास वनविभागास सहकार्य करून वन संरक्षण व संवर्धनाचे काम केल्याबद्दल त्यांना सुधागड-पाली वनविभागातर्फे सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



तालुक्यात मागील काही दिवसांत विविध ठिकाणी वणवे लागले होते. यावेळी येथील स्थानिक नागरिक वणवे विझवण्यासाठी पुढे आले. त्यांच्या प्रसंगावधानामुळे वनांचे मोठे नुकसान होणे टळले. शिवाय पशुपक्षी व जैवविविधतेचे नुकसान होण्यापासून वाचले. या कार्याची दखल घेऊन वनपरिक्षेत्र अधिकारी सुधागड विशाल सोनवणे यांनी घेतली. आणि या सर्व नागरिकांना उप वनरक्षक अलिबाग वनविभाग अलिबाग यांच्या मान्यतेने सन्मानपत्र दिले.

दत्तात्रय सावंत. रा. पाली, अमित निंबाळकर. रा पाली, शंतनू लिमये रा. पाली, मिलींद गोळे रा. पाली, गुलाब हिरवे रा. कळंब, नथुराम चव्हाण रा. आसरे, सदा शिद. रा. गोंदाव कसईशेत, वामन वाघमारे. रा गोंदाव कसईशेत. अमित चव्हाण रा. दिघेवाडी, सादुराम वारगुडे. रा. शरदनगर, मारुती देशमुख. रा. ताडगाव, दिलीप विष्णु देशमुख. रा. वाघोशी, मोरु भागु दळवी रा. भेलीव व रमेश रामजी आखाडे रा. वडाचा माळ या नागरिकांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## एक्स्प्रेस वेवर इनोव्हा कारची लाईटच्या खांबाला धडक

**खोपोली: प्रतिनिधी**

मुबंई पुणे एक्सप्रेसवेवर आज सकाळी एका इनोव्हा कारने समोरील स्ट्रीट लाईटच्या पोलला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला आहे,



मुबंई पुणे एक्सप्रेसवेवरून इनोव्हा कार चालक सुनील तानाजी बांधवने (रा अकोले अहमदनगर) हा पुण्याहून मुबंई कडे घेऊन जातं असताना तो बोरघाटात अंडा पॉईंड जवळ आला असता चालकाचे कार वरील नियंत्रण सुटल्याने कारने समोरील संरक्षण कठड्याला जोरदार धडक देऊन स्ट्रीट लाईटच्या खांबाला जोरदार धडक दिली यात कोणालाही दुखापत झाली नसून कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे

## रिलायन्स फाऊंडेशनमध्ये सान्वी कदम प्रथम क्रमांकाने पास

**चौक:प्रतिनिधी**

सान्वी अजित कदम ही रिलायन्स फाऊंडेशन (धीरूभाई अंबानी स्कूल) लोधीवली या स्कूल ची विद्यार्थिनी हिने १२ वी परीक्षेत गुण ९१ टक्के गुण प्राप्त करून रिलायन्स फाऊंडेशन मध्ये प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



कुमारी सान्वी अजितराव कदम ही वावंढळ गावची विद्यार्थिनी असून अगदी पहिली पासून शाळेत प्रथम श्रेणीत येण्याचा मान होता, अभ्यास,खेळ, मनोरंजन यातही तिचे प्राविण्य आहे. आपल्या यशात आई सौ.अर्चिता आणि वडील अजित यांच्या बरोबर शाळेतील शिक्षक आणि मार्गदर्शक मधुरा अर्जुन कदम यांचे मार्गदर्शन लाभले असे कुमारी सान्वी हिने सांगितले. सरपंच सुहास कदम यांनी तिचे अभिनंदन केले.

पान १ वरुन

## शेकाप नेते जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांचा पक्षाला अखेरचा लाल सलाम!

या बैठकीला शेकापचे अनेक पदाधिकारी, माजी नगरसेवक-नगरसेविका, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी जे. एम. म्हात्रे यांनी आपली भूमिका जाहीर करून उपस्थितांकडून त्यांची मते जाणून घेतली असता त्यांनीसुद्धा भाजपमध्ये जाण्यास समर्थन दिले. त्यामुळे आम्ही सर्वजण भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे म्हात्रे यांनी या वेळी पत्रकारांशी बोलताना जाहीर केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याशी चर्चा केल्यानंतरच भाजप प्रवेशाची तारीख व वेळ ठरली असल्याचेही त्यांनी सांगितले.

माझ्यासोबत प्रवेश करणारे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भाजपमध्ये योग्य तो न्याय व मान-सन्मान मिळेल, अशी ग्वाही जे.एम. म्हात्रे यांनी दिली, तर विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे म्हणाले की, नागरी प्रश्नांच्या सोडवण्यासाठी आम्ही आग्रही होतो व आतासुद्धा पाठपुरावा करून हे प्रश्न सोडवू. कोणत्याही अपेक्षेने व पदाच्या लालसेने आम्ही भाजपमध्ये प्रवेश करीत नसल्याचेही त्यांनी सांगितले. माजी नगरसेवक गणेश कडू यांनीसुद्धा आपल्या भावना व्यक्त केल्या.

# माय-दे-देउस यात्रा उत्साहात
### रेवदंड्यातील ख्रिस्ती बांधव, भगिनींची मोठी उपस्थिती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंड्यातील ऐतिहासीक काळाच्या स्मृती जागविणारा पोतृगिज कालीन माय-दे-देउस यात्रा मोठया उत्साहात संपन्न झाली, या उत्सवाचे निमित्ताने मुरूड तालुक्यातील कोर्लई व संपुर्ण महाराष्ट्रात विखुरलेल्या ख्रिस्ती बांधव व भगीनीची मोठी उपस्थिती होती.

रेवदंडा गोळा स्टॉपनजीक कोर्लईच्या ख्रिस्ती बांधव व भगीनीचे श्रध्दास्थान असलेले प्राचीन माय-दे-देउस मंदिर आहे. या मंदिरात प्रतिवर्षी फक्त ५ मे या दिवशीच मोठी उत्सव यात्रा संपन्न झाली. कोर्लई येथील ख्रिस्ती बांधव व भगीनीसह मोठया संख्येने विखुरलेले ख्रिस्ती बांधव व भगीनी यांच्या उपस्थितीत मोठया उत्साहाने माय-दे-देउस मंदिरात श्रध्दा व भाविकतेने उत्सव साजरा करण्यात आला. गेले महिनाभर पारंपारीक पध्दतीने कोर्लई येथून रेवदंडा माय-दे-देउस मंदिरात चालत येउन मोठया भक्तीने पुजाअर्चा ख्रिस्ती बांधव व भगिनींने केली.



माय-दे-देउस उत्सवाचे दिवशी मंदिरात पुजाअर्चा, प्रार्थना व आरतीचा कार्यक्रम सकाळी ९ वाजण्याचे सुमारास संपन्न झाला, त्यानंतर रितीरीवाजाप्रमाणे माय-दे-देउस मातेची पालखी रेवदंडा बाजारपेठेतून काढण्यात आली. रेवदंडा बाजारपेठेत असंख्य ख्रिस्ती बांधव व भगीनीसह माय-दे-देउस मातेची शिस्तंबध्द पालखी सोहळा पहाण्यासारखा असतो. रेवदंडा बाजारपेठेतून थेट विठोबा आळी मार्गे पुनस्यः मातेच्या मंदिराकडे पालखी सोहळा प्रस्थान करतो.

त्यानंतर मंदिर प्रांगणात ख्रिस्ती बांधव कोर्लई चर्च फादर यांचे मार्गदर्शनाखाली सत्कार सोहळा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. यावेळी विविध स्तुत्य उपक्रमासह मान्यवर ख्रिस्ती बांधवाचा सत्कार करण्यात आला. या उत्सवाचे निमित्ताने माय-दे-देउस मंदिरात उत्कृष्ट सुशोभिकरण करण्यात आले होते. मोठया धार्मिकतेने ख्रिस्ती बांधव व भगीनीने यात्रा उत्साहाने साजरी केली.

# कलाविष्काराने माणगाव नगरपंचायत जलशुद्धी केंद्राचे रूप पालटले

**माणगांव: बातमीदार**

माणगांव उतेखोलगांव येथील नगरपंचायत जलशुद्धीकरण केंद्रातील रिनिव्हेशन (नुतनीकरण) केलेला जुना फिल्टर प्लाण्ट दूरुस्ती व डागडूजी नंतर आकर्षक रंगरंगोटी करुन सजविण्यात येत आहे. येथील भिंती वर आपल्या कलेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील एक अवलिया कलाकार आपला कलाविष्कार साकारत आहे. त्यामुळे हा उतेखोल येथील जलशुद्धीकरण परिसर आणि येथील जूनाच फिल्टरेशन प्लाण्ट रिनिव्हेशन नंतर नव्या रुपात माणगांवकरांना आता पाहायला मिळत आहे.



डिजीटल एआयच्या आधुनिक जमान्यात जातीवंत चित्रकारांची कलाकारी मागे पडत चालली, सर्वत्र डिजीटल चित्र, बॅनरचा वापर होत असल्याने हे कलाकारच दिसेनासे झाले. अशा विपरित परिस्थितीत ग्रामीण भागातील पंचशील नगर विळे येथील 'सुधीर सावळाराम ओव्हाळ' एक जातीवंत चित्रकार कोणतेही प्रशिक्षण अथवा कोर्स न करता केवळ आपल्या अंगभूत कलागुणांचा वारसा जोपासताना म्हणतो, कलेला मरण नाही आधुनिक जमान्यातही चित्रकारांस करण्यासारखे काम खूप आहे, तासनतास मेहनत, जिद्द, चिकाटीच्या जोरावर जातीवंत कलाकार प्रतिकूल परिस्थितीतही अस्तित्व टिकवून आहेत असे त्याने म्हटले आहे.

सुधीर ओव्हाळने आपल्या चित्रकलेच्या बळावर अनेक साईन बोर्ड पेंटींग, पोर्ट्रेट पेंटींग, सर्व प्रकारची भित्तीचित्र आजवर लिलया साकारली आहेत. आपल्या कलाकारीने कर्नाटक चित्रालयाची प्रोफेशनल आर्टीस्टची मेंबरशिप त्याने मिळवली आहे. नुकतेच बेंगलोर येथील एका चित्र प्रदर्शनात त्याची दहा कॅनव्हास पेंटींग चांगल्या किंमतीत विकली गेली, लेखक उमेश दोशी (होमिओपॅथ) लिखीत गोष्टी अंतर्मनातील या पुस्तकाचे बोलके मुखपृष्ठ देखील त्याने तयार केले, शासनाचे स्वच्छ भारत अभियान, माझी वसुंधरा, योजनांची जनजागृतीपर चित्र व विशेष मुंबईत कोरोना काळात जनजागृतीपर पोस्टर सूधीरने चितारल्याचे सांगितले.

विळे गावच्या या कलाकाराने प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत जेमतेम इयत्ता ९वी पर्यंतच शिक्षण घेतले आहे. कुटुंबाला हातभार लावण्यास कलेच्या माध्यमातून तो चार पैसे कमावित प्रपंच चालवितो. डिजीटल जमान्यात पेंटींग, पोर्ट्रेट पेटींगचा वारसा जतन करणाऱ्या सुधीरने आपल्या सोबतच थरमरी आदिवासी वाडीतील तरुण सचिन नामदेव जाधव याला देखील रोजगार दिला आहे

# बारावीत जेबीएसपी संस्थेने धवल यशाची परंपरा राखली

## गव्हाण-कोपर ज्युनिअर कॉलेजचे शंभरनंबरी यश

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

गव्हाण-कोपर येथील जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण भगत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सने बारावीच्या परीक्षेतउत्कृष्ट यश संपादन केले आहे. यापरीक्षेस एकूण ६२ विद्यार्थी बसले होते आणि विशेष बाब म्हणजे सर्वच्या सर्वविद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या निकालामुळे विद्याथ्यारमध्ये आणि शिक्षकांमध्येआनंदाचे वातावरण आहे.विद्यालयाने गुणवत्ता यादी देखील जाहीर केली आहे. प्रथमेश चौहान याने ४९८गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, व्दितीय क्रमांक आराध्य विचारे हिने ४२९गुण आणि तृतीय क्रमांक प्राचीती म्हात्रे हिने ४२७ गुण मिळवले आहेत. या निकालामध्ये ५ विद्याथ्यारना डिस्टिंक्शन, १४ विद्याथ्यारना प्रथम श्रेणी आणि ४३विद्याथ्यारना द्वितीय श्रेणी प्राप्त झाली आहे

विद्यालयाच्या या शानदार यशाबद्दलसंस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह सर्व सदस्य, तसेच मुख्याध्यापकआणि शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या

## खारघरच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

सर्व विद्यार्थ्यांनी यश मिळवून विद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. विज्ञान आणि वाणिज्य मिळून एकूण ३७२ विदयार्थी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते. यात वाणिज्य शाखेतून १५३ आणि विज्ञान शाखेतून २१९ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते.

वाणिज्य शाखेचा निकाल १००% लागला असून विद्यालयामध्ये कु. अब्दुल रेहमान अतिक अहमद ९२.५० टक्के घेऊन प्रथम, कु. पुष्टी देवानंद शर्मा ९०.६७ टक्के घेऊन द्वितीय तर कु नूरेन फरयाज शेख ८९.१७ टक्के घेऊन तृतीय आली आहे.

विज्ञान शाखेचा निकाल सुध्दा १००% लागला असून यामध्ये विदयालयात कु. सानिया दादामिया भाटकर ८५.६७ टक्के घेऊन प्रथम, ८०.९३ टक्के घेऊन अरमान टिपू शेख द्वितीय तर कु खादिजा मुनाफ मुल्ला हिने ७९.१७ टक्के घेत तृतीय आली आहे.

प्राचार्या निशा नायर यांनी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे विशेष कौतुक करताना सांगितले की, हा निकाल आपल्या सर्वांच्या मेहनतीचे फलित आहे. शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी समन्वयाने केलेल्या प्रयत्नामुळे हे शक्य झाले.

या यशाबद्दल चेअरमन लोकनेते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख , अध्यक्ष अरुणशेठ भगत , सचिव डॉ. एस टी गडदे, ज. भ. शि. प्र. संस्था सदस्य संजय भगत स्कुल कमिटी सदस्य प्रभाकर जोशी यांनी अभिनंदन करुन कौतुक केले.

# एचएससी परीक्षेत गव्हाण विद्यालयाचे उज्ज्वल यश

## विद्यालयाचा निकाल ९६.९०% ▌ वाणिज्य शाखा १००%, तर कला शाखा ९५.६५%

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी - २०२५ मध्ये संपन्न झालेल्या एच.एस.सी.अर्थात इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून ' रयत शिक्षण संस्थे ' च्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचा निकाल ९६.९० % एवढा लागला आहे. तर वाणिज्य शाखेचा निकाल १००% लागला.

विद्यालयामधील कला व वाणिज्य या दोन्ही शाखेत मिळून १२९ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झाले.त्यापैकी १२५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.मात्र वाणिज्य शाखेच्या शंभर टक्के निकालाची परंपरा विद्यालयाने कायम राखली असून वाणिज्य शाखेतून एकूण ३७ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ठ झोले व सर्वजण उत्तीर्ण झाले. विद्यालयाचा कला शाखेतून परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या ९२ विद्यार्थ्यांपैकी ८८ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन कला शाखेचा निकाल ९५.६५ % एवढा लागला.

विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आदरणीय लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत तसेचरयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख,विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी आणि गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत,विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे,उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशीकला पाटीलरयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर,विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख बाबुलाल पाटोळे व पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

**विद्यालयातील प्रथम तीन क्रमांक** :-

१) प्रथम : कु.आंबेकर सलोनी अनिल,४८७ गुण ( ८१.१७ % )

२) द्वितीय : ओवळेकर स्वयंम धर्मा, ४८० गुण ( ८०.०० % )

३) तृतीय : कु.शेजूळ आरती रामेश्वर,४७८ गुण ( ७९.६७ % )

**वाणिज्य शाखेतील प्रथम तीन क्रमांक**

१) प्रथम : कु.आंबेकर सलोनी अनिल,४८७ गुण ( ८१.१७ % )

२) द्वितीय : ओवळेकर स्वयंम धर्मा,४८० गुण ( ८० % )

३) तृतीय : कु.घरत पूर्वा रमेश,४५२ गुण ( ७५.३३ % )

**कला शाखेतील प्रथम तीन क्रमांक**

१) प्रथम : कु.शेजूळ आरती रामेश्वर,४७८ गुण ( ७९.६७ % )

२) द्वितीय : कु.नाईक हर्षदा सुभाष,४१३ ( ६८.८३ % )

३) तृतीय : कु.शिकारे आरती राजू,४१२ ( ६८.६७ % )

## आता नवी मुंबईत 'एफोटेल बाय सयाजी'

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सयाजी हॉटेल्सने नवी मुंबईतील तळोजा एमआयडीसीमध्ये एफोटेल बाय सयाजी, लॉँच करण्याची घोषणा केली आहे. ही एक स्मार्ट आणि समकालीन हॉटेल आहे जी नवी मुंबईच्या सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रदेशांपैकी एकामध्ये निर्दोष आदरातिथ्य प्रदान करते.

लॉँचिंगबद्दल एफोटेल बाय सयाजीचे संचालक ऑपरेशन्स काशिफ मेमन म्हणाले की, आम्हाला एफोटेल बाय सयाजीसह नवी मुंबईत विस्तार करण्यास उत्सुकता आहे. आमचे उद्दिष्ट असा हॉटेल अनुभव तयार करणे आहे जो व्यवसाय कार्यक्षमता आणि विश्रांतीच्या आरामाचा समतोल साधेल.



पनवेल : जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर काहीही साध्य करता येते हे गव्हाणग्रामपंचायतीच्या माजी सरपंच आणि पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत यांनी सिद्ध करून दाखवले आहे. त्यांनी वयाच्या ५५व्या वर्षी आपले बीएचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. रत्नप्रभा घरत यांनी शिक्षण घेण्याची तीव्र इच्छाशक्ती दाखवत या वयातही अभ्यास पूर्ण केला ही खरंच प्रेरणादायी बाब आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले. या वेळी अरुण घरत, राहुल घरत उपस्थित होते.



पनवेल : महिला मोर्चाच्या कार्यकर्त्या वर्षा नाईक यांनीही आपले बीएचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. त्यांचेदेखील लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले. गृहिणी तसेच राजकारणात सक्रिय असूनही त्यांनी शिक्षणाला महत्त्व देत आपले ते पूर्ण केले. या अभिनंदन सोहळ्याप्रसंगी कामगार नेते रवी नाईक, अरुण घरत आदी उपस्थित होते.



पनवेल : उलवा नोडमधील भारतीय जनता युवा मोर्चाचे कार्यकर्ते मनोज नाईक यांचा वाढदिवस सोमवारी साजरा झाला. यानिमित्त त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन मनोज नाईक यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, कामगार नेते रवी नाईक, नामदेव ठाकूर, दीपक गोंधळी, सुहास गोंधळी, रविकांत म्हात्रे, समाधान ठाकूर, वैभव नाईक, अजय नाईक, संदीप म्हात्रे उपस्थित होते.



पनवेल: भाजपचे पोयंजे गाव अध्यक्ष रवींद्र गायकवाड यांचा वाढदिवस सोमवारी साजरा झाला. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गायकवाड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी तालुकाध्यक्ष तानाजी खंडागळे उपस्थित होते.

## शालेय विद्यार्थ्यांना गावातच मिळाले विविध दाखले!

**नवीन पनवेल :** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून १ मे रोजी महसूल विभागाच्यावतीने शेतकरी, विदयार्थी, महिला यांच्या दैनंदिन प्रश्नाचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी निकाली काढण्यासाठी तसेच महसूल प्रशासन लोकाभिमुख गतीमान करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे महसूल मंडळ विभाग पळस्पे अंतर्गत तलाठी सजा पळस्पेमधील ग्रामपंचायत कार्यालय पळस्पे तसेच खेरणे, आकुर्ली, कुंडेवहाळ येथे आयोजित केले गेले.

याावेळी विदयार्थीना जातची प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन दाखले असे विविध दाखले गावातच देण्यात आले मयतांच्या वारसांना सात बाराचे ही वाटप करण्यात आले

## सीकेटी ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल ९९.३९ टक्के

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी (फेब्रु/मार्च २०२५) बोर्ड परीक्षेचा एकूण निकाल ९९.३९ टक्के लागला आहे.

कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून बोर्ड परीक्षेस एकूण १३१५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यातून १३०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

कला शाखेचा निकाल ९६.२९ टक्के लागला असून कला शाखेतून ११० विद्यार्थी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट झाले होते .त्यातून १०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेतून कदम पार्थ मंगेश माधवी हा विद्यार्थी ८०.०० टक्के गुण मिळवून प्रथम, जाधव श्रावणी संदीप राणी ही विद्यार्थिनी ७५.५० टक्के गुण मिळवून द्वितीय तर कोळी जानवी संतोष वैशाली या विद्यार्थिनीने ७४.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

वाणिज्य शाखेचा निकाल ९९.०५ टक्के लागला असून वाणिज्य शाखेतून ४२३ विद्यार्थी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यातून ४१९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य शाखेतून साहू आयुष राकेश हेमा हा विद्यार्थी ९४.३३ टक्के गुण मिळवून प्रथम , शिंदे स्नेहा विनोद वंदना ही विद्यार्थिनी ९२.५० टक्के गुण मिळवून द्वितीय तर गमरे भूमी सुमित सुषमा या विद्यार्थिनीने ९१.१७



टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून विज्ञान शाखेतून ७८४ विद्यार्थी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट झाले होते त्यातून ७८४विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेतून जाधव सिद्धेश कुमार दिपाली हा विद्यार्थी ९१.८३ टक्के गुण मिळवून प्रथम, करनेकर श्रावणी मनीष मीनल ही विद्यार्थिनी ९१.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर वैनगनकर इंद्र प्रसाद भाग्यश्री व जाधव यशराज सतीश तेजस्विनी या दोन्ही विद्यार्थ्यांनी ९०.०० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

एच एस सी बोर्ड परीक्षेत गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ,आमदार प्रशांत ठाकूर ,व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख , अध्यक्ष अरुणशेठ भगत , सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## निवडक

### कामासाठी आलेला व्यक्ती बेपत्ता



**पनवेल** : पनवेल येथे कामासाठी आलेला एक इसम बेपत्ता झाल्याची घटना घडल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. परश्या हानुमंत अप्पा (३५ रा.कर्नाटक) असे या इसमाचे नाव असून तो त्याच्या सहकार्यासह कामासाठी पनवेल येथे आला होता. तेथून तो बेपत्ता झाल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे ०२२-२७४५२३३३ किंवा सहा.पो.उपनि. हानुमंत आहिरे मो.नं.८८५०४८१०७५ येथे संपर्क साधावा.

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** पनवेल शहर परिसरातून एका मोटार सायकलची चोरी झाल्याची घटना घडली आहे.शुभम महाडिक याने त्याच्या नावे असलेली ६० हजार रुपये किंमतीची होंडा युनिकॉर्न एबीएस मोटार सायकल क्र.एमएच-४६-सीडी-५८८२ ही हेरिटेज मोटार्स येथे उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कुत्र्याला फेकल्याबद्दल गुन्हा दाखल

**पनवेल:** एका भटक्या कुत्र्याला बिल्डींगच्या उंचावरुन फेकून त्याच्या जीव घेवून आगळीक केली म्हणून सदर इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मॅरेथॉन नेक्सॉन पळस्पे फाटा येथील बिल्डींगच्या खाली जनरेटर रुमच्या पत्र्यावर कोणत्या तरी अज्ञात इसमाने कुत्र्यास वरुन फेकून त्याचा जीव घेतल्याबद्दल त्याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बांगलादेशीय नागरिकांवर कारवाई

**पनवेल:** बांगलादेशीय बेकायदेशीररित्या पनवेल परिसरात वास्तव्य केल्याप्रकरणी तसेच त्यांना मदत करणार्या अशा ७ जणांविरोधात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा नवी मुंबई यांनी कारवाई केली आहे. करंजाडे येथील सेक्टर ६ या ठिकाणी आन्ना खातून आकाश गाझी उर्फ आन्ना रफिकुल इस्लाम खान (३५) सोबत त्याची मुलगी सुरैना (५), आलो खातून इस्लाम खातून उर्फ आलो इस्माईल बिलाल डावर (३१), किया आकाश गाझी उर्फ किया रफिकुल इस्लाम खान (२१), रफिकुल इस्लाम खान उर्फ आकाश लतिफ गाझी (४०) त्यांच्या सोबत त्यांची अल्पवयीन मुलगी मेघना खान (१५), मोहम्मद इस्माईल अमिन्नोद्दीन येरुलकर (५२) व फरार असलेला इस्माईल एस.आर. यांच्या विरोधात कारवाई करण्यात आली आहे.

## सीकेटी मराठी माध्यमिक विद्यालयाचे प्रताप शिंदे सेवानिवृत्त



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गेली ३१ वर्षे कार्यरत असलेले प्रताप दत्तात्रय शिंदे यांच्या प्रदीर्घ आणि समर्पित सेवेचा सोमवार दि. ५ मे रोजी सेवापूर्ती व सेवा गौरव समारंभ विद्यालयात आयोजित करण्यात आला होता.

संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांनी शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी बोलताना वाय.टी. देशमुख साहेब यांनी सुरुवातीला लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्यावतीने ही शुभेच्छा दिल्या,यावेळी त्यांनी शिंदे सरांनी आपल्या सेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जीवनात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांची कामाप्रती असलेली निष्ठा आणि समर्पणभाव निश्चितच अनुकरणीय आहे. त्यांनी केवळ विद्यार्थ्यांना शिकवले नाही तर त्यांच्यावर चांगले संस्कारही केले आहेत. असे सांगून त्यांनी त्यांच्या भावी वाटचालीस मनः पूर्वक शुभेच्छाही दिल्या !

या समारंभास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे सत्कारमूर्ती श्री. शिंदे सर यांच्या पत्नी सौ. वैशाली शिंदे तसेच त्यांच्या संपूर्ण परिवाराने आवर्जून उपस्थिती दर्शविली. याशिवाय विद्यालयाचे प्राचार्य कैलास सत्रे, पर्यवेक्षक. कैलास म्हात्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्रभारी प्राचार्य. प्रशांत मोरे इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक. संतोष चव्हाण इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

संपादकीय

# कचऱ्याच्या विल्हेवाटीचा पेच

मुंबई महानगराला कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न अनेक वर्षे भेडसावतो आहे. शहरात दररोज साडेसहा हजार टन कचरा निर्माण होतो. कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी आधी गोराई, मुलुंड, देवनार आणि कांजुरमार्ग अशी चार डम्पिंग ग्राऊंड होती. परंतु सध्या कांजुरमार्ग येथेच मुंबईतील अवघा कचरा टाकला जात होता. मुंबई उच्च न्यायालयाने आता ही जागा 'संरक्षित वनजमीन' असल्याचा निकाल दिल्याने मोठा पेच निर्माण झाला आहे. मुंबईतील कचऱ्याकरिता मुंबईबाहेर कचराभूमी निर्माण करण्याच्या प्रयत्नांना तेथील स्थानिकांनी स्वाभाविकपणे विरोध केला आहे.

**मुंबई महानगराची लोकसंख्या केव्हाचीच दीड कोटीच्या घरात पोहोचली आहे. एकीकडे मुंबईतील वाहतूककोंडी सोडवण्यासाठी मोठमोठाले प्रकल्प राबवले जात असताना दुसरीकडे कचराकोंडीच्या बाबतीत मात्र मुंबई महापालिका पेचात सापडली आहे. मुंबईतील कांजुरमार्ग येथील सध्याचे एकमेव वापरात असलेले डम्पिंग ग्राऊंड ही 'संरक्षित वनजमीन' असल्याचा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच दिला. येथील जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करून कांजुरमार्गची ही जागा रिकामी करण्यासाठी तसेच कचराभूमीसाठी पर्यायी जागा निश्चित करण्यासाठी न्यायालयाने मुंबई महापालिकेला अवघ्या तीन महिन्यांची मुदत दिली आहे. त्यामुळे या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणे किंवा डम्पिंगसाठी पर्यायी जागा शोधणे हे दोनच पर्याय महापालिका आणि राज्य सरकारसमोर आहेत. यापूर्वीच्या चार डम्पिंग ग्राऊंड्सपैकी गोराई आणि मुलुंडची क्षमता संपली आहे. गोराईची कचराभूमी २०१७ मध्ये बंद करण्यात आली तर मुलुंड कचराभूमी बंद करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. देवनार कचराभूमीची जागाही धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी देण्यात आली आहे. त्यामुळेच एकमेव उरलेल्या कांजुरमार्ग कचराभूमीत अवघ्या मुंबईचा कचरा टाकला जात होता. तेथील प्रक्रिया वेगाने करणे शक्य होत नसल्यामुळे विक्रोळी ते मुलुंड परिसरातील नागरिकांकडून सातत्याने दुर्गंधी आणि आरोग्यविषयक समस्यांच्या तक्रारी केल्या जात होत्या. त्यातच 'वनशक्ती' संस्थेने न्यायालयात या कचराभूमी विरोधात जनहित याचिका दाखल केली होती. अलीकडच्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्येही कांजुरमार्गची कचराभूमी बंद करण्याचे आश्वासन जवळपास सर्व राजकीय पक्षांनी दिले होते. यावरून येथील स्थानिकांच्या या कचराभूमीस असलेल्या विरोधाची कल्पना यावी. वास्तविक २००८ मध्येच एका अधिसूचनेद्वारे ही जमीन 'संरक्षित वनजमीन' घोषित झाली होती. मात्र वर्षभरात संबंधित अधिसूचना मागे घेण्यात आली. अधिसूचना मागे घेण्याचा हा निर्णय न्यायालयाने आता बेकायदा ठरवला आहे. वास्तविक कुठल्याच नागरिकांना आपल्या जवळपास कचराभूमी नको असते. सगळीकडे कचराभूमीविरोधात तक्रारी असतातच. भविष्यात तर वाढत्या लोकसंख्येमुळे इतरही अनेक महापालिकांसमोर घनकचऱ्याची समस्या गंभीर रूप धारण करून उभी राहणार आहे. तळोजा येथील संभाव्य डम्पिंग ग्राऊंडला स्थानिकांचा विरोध आहेच. अंबरनाथ येथेही कचराभूमी निर्माण करण्याचा विचार सुरू आहे. कचरा जमा करून ठेवण्यापेक्षा त्यापासून खतनिर्मिती वा वीजनिर्मिती करण्याच्या पर्यायांचा गांभीर्याने विचार केला जातो आहे. मात्र हे प्रयत्न अद्याप प्रयोगांच्या पातळीवर आहेत. एकाच जागेवर अवघ्या शहराचा कचरा टाकणे हे योग्य कसे म्हणता येईल? त्यामुळे विकेंद्रित पद्धतीने प्रत्येक प्रभागात छोटे-छोटे प्रकल्प सुरू करण्याचा विचारही करता येऊ शकेल. अद्यापही नागरिकांमध्ये आपल्या कचऱ्याची विल्हेवाट ही प्राधान्याने आपली स्वत:ची जबाबदारी आहे याची जाणीव नाही. ओला कचरा, सुका कचरा यांचे वर्गीकरण आजही शिस्तीने केले जात नाही. नागरिकांच्या सहभागाशिवाय या प्रश्नी तोडगा शक्य नाही.**

# अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना परदेश शिक्षणाची संधी

विविधतेत एकता असलेला भारत देश हा अनेक जाती समुहांचा एकसंध देश आहे. याची संस्कृती आणि एकता अबाधित राहण्यासाठी सर्व वर्गातील लोकांच्या विकासाबरोबरच अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात राहता यावे यासाठी केंद्र सरकार आणि राज्य शासन विविध सामाजिक आणि शैक्षणिक, आर्थिक योजना राबवितात. भारतात राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग कायद्याअंतर्गत मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन आणि झोरोस्ट्रियन (पारशी) या सहा धार्मिक समुदाय अल्पसंख्याक म्हणून ओळखले जातात.



**परदेश शिष्यवृत्ती योजना**

अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता असूनही आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित असलेल्या होतकरू व गुणवत्ताधारक मुलांना व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळवून देण्यासाठी त्यांना परदेश शिष्यवृत्ती योजना प्रदान करण्यात येते.

२०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता १५.१५ कोटी रुपये आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवी परीक्षेत किमान ५५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांची कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे आणि पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांची कमाल वयोमर्यादा ४० वर्षे आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न आठ लाखापेक्षा जास्त नाही, तसेच एकाच कुटुंबातील किमान दोन विद्यार्थ्यांनाच या शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येतो. ७५ विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्याने इतर कोणत्याही राज्य शासनाची अथवा केंद्र शासनाची अथवा अन्य संस्थांकडून परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी. प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा तसेच अभ्यासक्रमाचा कालावधी कमीत कमी दोन वर्षाचा असावा. एक्झीक्युटीव्ह पदव्युत्तर पदवी किंवा एक्झीक्युटीव्ह पदव्युत्तर पदविका व अर्धवेळ अभ्यासक्रमांत प्रवेशित विद्यार्थी या योजनेस पात्र असणार नाहीत.

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित कायम अथवा विना अनुदानित अथवा विनाअनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व दिव्यांग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येतात. या योजनेंतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात २४५ शाळांमध्ये ही योजना राबविण्यात आली आहे.

अल्पसंख्याक समाजातील होतकरू व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करण्यासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. आठ लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय व अर्धवैद्यकीय अभ्यासक्रम, तांत्रिक व व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी ५० हजार किंवा शैक्षणिक शुल्क तसेच बारावीनंतरचे कला, वाणिज्य, विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पाच हजार रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते.

राज्यातील अल्पसंख्याकबहुल क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकांना २० लाख, अ वर्ग नगरपालिकांना १५ लाख, तर ब व क वर्ग नगरपालिकांना १० लाखांपर्यंत अनुदान देण्यात येते.

राज्यातील अल्पसंख्याकांना शिक्षण, आरोग्य, निवास सुविधा, रोजगार, पतपुरवठा व इतर मुलभूत सुविधाप्राप्त करण्यासाठी सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या विविध प्रश्नांबाबत संशोधन करून त्यावर उपाययोजना करणे. यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख व्यावसायिक शिक्षण देणे. मुंबईतील मांडवी, उपनगरमधील चांदिवली येथे व राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि वसतिगृहात विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या/तिसऱ्या पाळीत अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहे. ४४१६ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे तसेच शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये दुसऱ्या पाळीत अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण देण्यात येते.

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आहारासाठी ०.४० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत वसतीगृह, शाळा इमारत, इत्यादी संस्थाद्वारे अल्पसंख्याक बहुल जिल्ह्यातील लोकांच्या एकंदर राहणीमानाचा दर्जा उंचावणे, मुलभूत सुविधा उपलब्ध करून त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तरात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. यासाठी राज्य हिस्सा ८० कोटी, केंद्र हिस्सा १२० कोटीची निधीची तरतूद करण्यात आली आहे.

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीसाठी वसतिगृह योजनेंतर्गत मुलींसाठी वसतिगृहाची सोय उपलब्ध करून मुलींच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी तीन कोटी निधीची तरतूद करण्यात आली. २५ जिल्ह्यांमधील ४३ शहरे अल्पसंख्याकबहुल क्षेत्र घोषित केली आहेत. अशा २५ जिल्ह्यांमध्ये प्राधान्याने वसतिगृह उभारण्यात येणार आहेत. राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी शासकीय सेवा भरती पूर्व परीक्षा प्रशिक्षण वर्ग तसेच मराठी भाषा फाउंडेशन वर्ग चालविले जातात. तसेच आयोग आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सहाय्याने अल्पसंख्यांक महिलांचे मागासलेपण दूर करण्यासाठी स्वयंसहाय्यता गटांकरिता अनुदान देण्यात येते.

डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना अंतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात १९० पात्र मदरसांना एकूण ११.५५ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला. १६५ मदरसांमध्ये विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण देण्यात येते.

राज्यात उर्दू भाषेची वाड्.मयीन प्रगती, मराठी व उर्दू भाषेमधील लेखक, कवी, विचारवंत यामध्ये सर्जनशील विचारांची देवाणघेवाण होऊन उर्दू भाषेचा वाड्.मयीन विकास व्हावा यासाठी उर्दू घर नांदेड, मालेगाव, सोलापूर येथे कार्यान्वित असून नागपूर येथे काम सुरू आहे.

याचबरोबर अल्पसंख्याक लोकसमुहाकरिता धर्मक्षेत्र व परिसर विकास आराखडा योजना, महिला बचत गटातील सदस्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे, महिला व युवकांना कौशल्य प्रशिक्षण देणे, पोलीस भरती पूर्वपरीक्षा पूर्व प्रशिक्षण देण्याकरिता अल्पसंख्यांक विभागाच्यावतीने योजना राबविण्यात येतात.

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्याची संधी मिळणे ही केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रगतीची बाब नाही तर ती संपूर्ण समाजाच्या विकासाची दिशा आहे. त्यामुळे अल्पसंख्याक समूहातील विद्यार्थ्यांनी शासनाच्या परदेश शिक्षणाच्या योजनेचा लाभ घेऊन आपल्या जीवनाला नवी दिशा द्यावी.

**-श्रद्धा मेश्राम, सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

## बदलते तंत्रज्ञान

# वायफाय स्लो चालतोय? 'या' टिप्स फॉलो करा

आज आम्ही तुम्हाला वायफायच्या काही टिप्स सांगणार आहोत. तुमचा वायफाय स्पीड स्लो झाला असेल आणि तुम्ही यामुळे त्रस्त असाल तर हा लेख तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतो.



तुम्ही वायफायवापरत असाल तर ही माहिती तुमच्यासाठी खास आहे. आजकाल बहुतांश लोकांना आपल्या घरात वायफाय असणे आवडते. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे लोकांना यात जास्त डेटा मिळतो, ज्याचा वापर ते आपली कामे सेटल करण्यासाठी करू शकतात. यात इंटरनेटचा स्पीडही चांगला आहे, जेणेकरून लोकांना आपलं काम करण्यासाठी वाट पाहावी लागणार नाही.

कधीकधी वायफायचा स्पीड कमी असू शकतो, ज्यामुळे लोकांना त्रास होऊ शकतो. जर तुमचा वायफायस्पीड स्लो झाला असेल आणि तुम्ही यामुळे त्रस्त असाल तर हा लेख तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. आम्ही तुम्हाला वायफाय च्या काही सोप्या टिप्स सांगत आहोत जेणेकरून तुम्ही तुमच्या वायफायचा स्पीड वाढवू शकाल.

राउटर पुन्हा सुरू करणे हा सर्वात सोपा आणि प्रभावी मार्ग आहे. तुमच्या वायफायचा राउटर बंद करा, काही सेकंद थांबा आणि नंतर वायफायचा राऊटर परत चालू करा. यामुळे वायफाय रिफ्रेश होईल आणि इंटरनेट स्पीड वाढेल.तुमचे वायफायचे राउटर घराच्या मध्यभागी ठेवल्याने सिग्नल सर्व दिशांना समानपणे पसरतील. वायफाय राउटर धातूच्या वस्तू, भिंती आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांपासून दूर ठेवा, कारण यामुळे सिग्नलमध्ये अडथळा येऊ शकतो.

वायफाय राउटरचा अँटेना सेट करा अनेक वायफाय राउटरमध्ये ॲडजस्टेबल अँटेना असतो. जर तुमच्या राउटरमध्ये अँटेना असेल तर ते अशा प्रकारे सेट करा की सिग्नल चांगल्या प्रकारे पोहोचेल. कोणती दिशा सर्वोत्तम सिग्नल देते हे पाहण्यासाठी अँटेना वेगवेगळ्या दिशांना फिरवा.जर तुमच्या घराच्या काही भागात तुमचे वायफाय सिग्नल विक असेल तर तुम्ही वायफाय रेंज एक्सटेंडर वापरू शकता. हे डिव्हाईस तुमचे वायफाय सिग्नल वाढवते आणि दूरच्या ठिकाणी प्रसारित करते.

तुमच्याकडे तुमच्या वायफाय नेटवर्कशी अनेक डिव्हाईस जोडलेले असतील तर यामुळे इंटरनेटचा वेग देखील कमी होऊ शकतो. तुमच्या वायफाय सोबत किती डिव्हाईस कनेक्ट आहेत ते तपासा. अनावश्यक डिव्हाइसेस डिस्कनेक्ट करा.

# संगीतसम्राट पं. तानसेन

पं. तानसेन ऊर्फ रामतनु ऊर्फ तन्नामित्र, त्रिलोचन, तनसुख यांचा जन्म इ.स. १५३२, बेहट येथे तर मृत्यू ६ मे १५८९ रोजी झाला. ते अकबराच्या दरबारातील प्रसिद्ध नवरत्नांपैकी एक रत्न होते. पं. तानसेन हे संगीतशास्त्रात निपुण होते. त्यांना 'मियां तानसेन' असे सुद्धा म्हणत.

पं. तानसेन यांच्या वडिलांचे नाव मकरंद पांडे होते. त्यांच्याकडेच पं. तानसेन ह्यांचे प्रारंभिक शिक्षण घेतले. सुफी संत गौस मोहंमद ह्यांचेही त्यांना मार्गदर्शन लाभले. त्यानंतर त्यांनी वृदांवन येथील गुरू स्वामी हरीदास्यांचेहशिष्यत्व स्वीकारलेते. त्यांच्याकडुन .पं तानसेन ह्यांनी २००च्या पेक्षा अधिक धृपदे आत्मसात केली. त्यांच्याकडे पं. तातानसन ह्यांनी सुमारे १० वर्षे संगीताचे शिक्षण घेतले. तानसेन ह्यांचा आवाज अतिशय गोड पण मर्दानी व पल्लेदार होता. मीयां मल्हार, मीयां का सारंग व मीयां की तोंडी ह्यासारखे नवीन राग तानसेन ह्यांनी शोधुन काढले. रबाब नावाचे वाद्य त्यांनी तयार करून विकसीत केले. संगीतसार व रामाला हे दोन ग्रंथ पं. तानसेन ह्यांनी लिहीले.

पं. तानसेन हे एक उत्तम गायक होता. त्यामुळे रेवा संस्थान नरेश राजा रामचंद्र यांनी तानसेन यांना राजगायक म्हणुन नेमले होते. व नंतर अकबर बादशहाने खुप



निमित्त

सारे सोने देउन पं. तानसेन ह्यांची मागणी केली ज्याला रामचंद्र नाही म्हणु शकले नाहीत. अकबराला न दुखवण्यासाठी त्यांनी भेट म्हणून पं.तानसेन ह्यांना देउन टाकले.

पं. तानसेन हे अकबर बादशहा याच्या दरबारातील नवरत्नापैकी एक होते. त्यांच्या पत्नीचे नाव हुसेनी होतो. त्यांना चार मुले व एक मुलगी होती. सुरतसेन, शरदसेन, तरंगसेन व विलास खान आणि मुलगी सरस्वती असे होते.

तानसेनाचे गुरू नक्की कोण - याबाबतीतही दुमत आहे. जुने हिंदू व मुस्लिम संदर्भ वेगवेगळी नावं देतात. त्यानुसार काही जण त्यावेळचे वृंदावनमधील संत हरिदास हे तानसेनाचे गुरू मानतात तर काही जण सूफी संत मुर्शिद महम्मद घौस (ग्वालियरी) यांना त्याचे गुरू मानतात. पण संत हरिदासांना गुरू असल्याचं मानणार्यांचं पारडं जड आहे. त्यामुळे पुढे कुणीतरी अशीही एक आख्यायिका जोडून दिलेली दिसते की 'तानसेन लहानपणी मुका होता. एकदा ग्वाल्हेरला गेलेला असता तो महम्मद घौस यांना भेटला. तिथेच सोबत संत हरिदासही बसले होते. महम्मद घौस यांनी तन्नाच्या मुखात फुंकर मारली आणि तो बोलू लागला. लगेचच त्यांनी स्वामी हरिदास यांना तन्नाला संगीत शिकवायला सांगितलं'. परंतु ह्या कथेत फारसं तथ्य नसावं. शिवाय तन्नाचे वडिल एक कवी व संगीतकार होते, त्यामुळे तन्नाचं प्राथमिक संगीत शिक्षण वडिलांकडेच झालं असणार. त्यानंतर धृपद गायकी करणारे स्वामी हरिदास हे तानसेनाचे गुरू झाले असावेत. जाता जाता सांगायची गोष्ट, स्वामी हरिदासांची भेट दक्षिणेतील संत पुरंदरदासांशी (तेच ते, ज्यांना कर्नाटकी शास्त्रीय संगीताचे आद्य प्रवर्तक मानलं जातं, त्यांची रचना 'भाग्यदा लक्ष्मी बारम्मा' सर्वश्रुत आहे) झाली होती. त्यांच्या संगीताचा प्रभाव हरिदासांच्या धृपद गायकीवरही पडला होता. त्याशिवाय तानसेनाच्या गायकीवर महम्मद घौस यांच्या सूफी संगीताचा प्रभावसुद्धा होता. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




आरोग्य प्रहर

# 'या' नैसर्गिक गोष्टी चेहरा ठेवतील मुलायम आणि फ्रेश

प्रत्येकाला फ्रेश आणि चमकदार त्वचा हवी असते, परंतु उन्हाळ्यात अनेक लोकांच्या त्वचेतून अतिरिक्त सेबम (तेल) तयार होऊ लागते आणि त्यामुळे चेहरा खूप लवकर चिकट होऊ लागतो आणि निस्तेज दिसू लागतो. सध्या, आपण अशा काही नैसर्गिक गोष्टींबद्दल जाणून घेऊया ज्यामुळे त्वचेचे तेल नियंत्रित होईल आणि त्वचा फ्रेश होईल.



पाण्याने समृद्ध असलेली काकडी उन्हाळ्यात शरीराला थंड ठेवण्यास मदत करते आणि त्वचेला ताजेतवाने देखील करते. तेलकट त्वचा ताजी करण्यासाठी देखील काकडी खूप प्रभावी आहे. यासाठी काकडी सोलून त्याचे तुकडे करा आणि नंतर पुन्हा बारीक करून पेस्ट बनवा, त्यात चिमूटभर हळद आणि कोरफडीचे जेल घाला आणि चेहऱ्यावर लावा. हा फेसपॅक तुमच्या तेलकट त्वचेची समस्या दूर करेल.

वजन नियंत्रित करण्यासाठी, बरेच लोकं ग्रीन टीला त्यांच्या दिनचर्येचा एक भाग बनवतात. तुम्हाला तंदुरुस्त ठेवण्यासोबतच ग्रीन टी तुमची त्वचा देखील फ्रेश ठेवते. त्याचबरोबर ग्रीन टी त्वचेवरील तेल नियंत्रणासाठी सर्वोत्तम घटकांपैकी एक आहे. तुम्ही ग्रीन टी पाण्यात उकळा आणि स्प्रे बाटलीत भरा. ते दररोज टोनर म्हणून वापरा, जे त्वचेचे तेल नियंत्रित करेल आणि सुजलेली त्वचा बरी करण्यास मदत करेल.

तेल नियंत्रित करण्यासाठी, छिद्रे घट्ट ठेवणे महत्वाचे आहे. यासाठी सर्वोत्तम मार्ग म्हणजे टोमॅटो कापून फ्रीजमध्ये ठेवणे. कमीत कमी एक तासानंतर ते काढा आणि त्यावर थोडा लिंबाचा रस लावा आणि चेहऱ्याला गोलाकार पद्धतीने हलक्या हाताने मालिश करा. हे दोन्ही घटक छिद्रे घट्ट करणे, तेल नियंत्रित करणे, मुरुमे आणि पुरळ कमी करणे आणि टॅनिंग काढून टाकणे यासारखे अनेक फायदे देतात.

उन्हाळ्यात त्वचेला बरे करण्यासाठी आणि तेलकटपणा नियंत्रित करण्यासाठी मुलतानी मातीचा फेस पॅक लावावा. यासाठी एका भांड्यात एक चमचा मुलतानी माती पावडर एक चतुर्थांश चंदन पावडर आणि तेवढ्याच प्रमाणात संत्र्याच्या सालीची पावडर घ्या. चिमूटभर हळद मिसळा आणि गुलाबपाणी टाका आणि पेस्ट बनवा. हे आठवड्यातून दोन ते तीन वेळा किमान २०-२० मिनिटे चेहऱ्यावर लावा.

(या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत.)

# बारावीचा निकाल जाहीर; रायगडातील शाळांचे यश

## माणगावमधील अशोकदादा साबळे ज्युनिअर कॉलेजचा ९९ टक्के निकाल

**माणगाव : बातमीदार , प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या अशोक दादा साबळे कनिष्ठ महाविद्यालयाच्या बारावी विज्ञान शाखेचा ९९ %, बारावी वाणिज्य शाखेचा ९७ % तर बारावी कला शाखेचा निकाल ८४ % लागला आहे. दरवर्षी या तिन्ही शाखांतील बारावीचा निकाल शैक्षणिक दृष्ट्या उंचावण्यासाठी विविध प्रकारचे अभिनव शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. त्यामुळे या कनिष्ठ महाविद्यालयाने सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांमध्ये अव्वल स्थान कायम राखले आहे. या निकालामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

बारावी विज्ञान शाखेत प्रथम अथर्व प्रमोद झेमसे (५१५) ८५.८३ % द्वितीय मानसी राजेंद्र कोलवानकर (४८५) ८०.८३ % तृतीय सिद्धी महादेव घाडगे ( ४६६ ) ७७.६७ % वाणिज्य शाखेत प्रथम कीर्ती लक्ष्मण राठोड ( ४४८) ७४.६७ % द्वितीय श्रावणी भीम धाडवे (४११) ६८.५०% तृतीय मानवी मंगेश केकाणे (४०९) कला शाखेत प्रथम निशा उदय मोहरे ( ४७०)७८.३३ % द्वितीय सिद्धी दत्ताराम धसाडे (४४९) ७४.३३ % तृतीय मानसी महेंद्र शिंदे ( ४२२) क्रमांकांनी उत्तीर्ण झाले आहेत.

या कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेत एकूण २४७ विद्यार्थ्यांपैकी १४५, वाणिज्य शाखेत १२८ विद्यार्थ्यांपैकी १२४ तर कला शाखेत ११७ विद्यार्थ्यांपैकी ९८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा भाई गांधी, शाळा समिती चेअरमन नरेंद्र गायकवाड, अरुण पवार, सदस्य नितीन बामगुडे, मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी शाळेच्या चेअरमन निकीता साबळे, अशोक दादा साबळे विधी महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. गौतम राऊत, डॉ. आबासाहेब पाटणकर, प्राचार्य धनाजी जाधव आदी शिक्षकांनी अभिनंदन केले.

## चौकच्या यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचा ७०.५९ टक्के निकाल

**चौक : प्रतिनिधी**

यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाचा ९५.८३ तर कला शाखेचा ३७.८३ टक्के निकाल लागला आहे.८५ विद्यार्थी यांच्यातून ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कनिष्ठ महाविद्यालय यांचा ७०.५९ टक्के निकाल लागला आहे. कल्याणी गावडे वाणिज्य ८३.६७, मीनाक्षी राणे वाणिज्य ७८.८३, साहिल गावडे वाणिज्य ७७.५०,यास्मिन शेख वाणिज्य ७४.८३ तर द्यानेश्वर वाघे ७४.५० टक्के गुण मिळवून कनिष्ठ महाविद्यालय येथे प्रथम पाच येण्याचा मान प्राप्त केला.

उत्तीर्ण विद्यार्थी यांचे शिक्षक व संस्थेचे पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

## श्रीमती सविता नीलकंठ सावंत कॉमर्स कॉलेजचा ९०% निकाल

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळातर्फे आलेल्या बारावी परीक्षेत माणगाव येथील जे.बी. सावंत एजुकेशन सोसायटी संचालित श्रीमती सविता नीलकंठ सावंत कॉमर्स कॉलेजचा वाणिज्य शाखेचा बारावी परीक्षेचा निकाल ९० % इतका लागला असून कु. सानिया नथुराम मुंडे या विद्यार्थिनीने ७३.१७ % इतके गुण संपादन करून महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकाविला आहे.

या कॉलेजमधून कु. सानिका धोंडू शेडगे ६१.५०% गुण द्वितीय तर कु. प्रीती दत्तात्रय बेंदूगडे ६०% गुण तृतीय ,क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या महाविद्यालयातून यंदा बारावी परीक्षेसाठी एकूण २६ विद्यार्थी बसले होते त्यापैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा निकाल ९० % लागला. संस्थेचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत व संस्था पदाधिकारी यांनी विशेष कौतुक केले आहे.

## तळा तालुक्याचा निकाल ९९.४८ टक्के

**तळा : प्रतिनिधी**

उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा २०२५चा १२ वीच्या परीक्षेसाठी तळा तालुक्यातून १९५ विद्यार्थी बसले होते.त्यापैकी १९४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण निकाल ९९.४८% लागला आहे.

या परीक्षेत तालुक्यात विज्ञान शाखेची विद्यार्थीनी जान्हवी मुकेश जायस्वाल ६५.१७%गुण मिळवून विज्ञान शाखेत प्रथम,रिहान नासिर बेबल ६३.००%गुण मिळवून द्वितीय, तर ओमकार प्रदिप भोनकर ६२.३३%गुण मिळवून तृतीय आला आहे.तर वाणिज्य शाखेत प्रतिक प्रकाश कजबले ७५.६७%मिळवून प्रथम, लीलावती लक्ष्मण शिगवण ७५.५०% गुण मिळवून द्वितीय तर मंदिरा नरेश कांढरे ७५.००% गुण मिळवून तृतीय आली आहे.

कला शाखेत कस्तुरी उल्हास तळकर ही विद्यार्थीनी ६९.५०%गुण मिळवून प्रथम तर पारस शशांक सकपाळ ६५.५०% गुण मिळवून द्वितीय व सुनील टोपाजी अडागळे ६३.५०% गुण मिळवून तृतीय आला आहे.तालुक्यात वाणिज्य शाखेचा प्रतिक प्रकाश कजबले ७५.६७%गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे.


### मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

एम एम आर डी ए
MMRDA

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

वांद्रे – कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी: ०२२-६५९६०००१/०४ • वेबसाईट: https:mmrda.maharashtra.gov.in

**कार्यालयासाठी जागा हवी आहे**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला फर्निचरसह सुमारे १०,००० ते १२,००० चौ. फुट (±१०% तफावत स्वीकार्य) अशी सी. बी. डी. बेलापूर नवी मुंबई, पासून सुमारे २ कि. मी. परिसरात स्थित इमारतीमधील सुस्थितीत असलेली बांधीव जागा ६० महिन्यांकरिता भाडेपट्टा कराराने प्रतिमहा भाडे तत्वावर हवी आहे.

सविस्तर निविदा सूचनांसाठी **https://mahatenders.gov.in/nicqep/app** या संकेतस्थळाला भेट द्या.

आवश्यकता असल्यास, अतिरिक्त माहितीसाठी श्री. मिलिंद भा. पाटील, प्रमुख, नियोजन विभाग यांच्याशी दूरध्वनी क्र. ०२२-६५९६४०७७ अथवा ई-मेल: **kscnt @mailmmrda.maharashtra.gov.in** वर सपंर्क साधावा.

प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख: २१ मे, २०२५ दु. ५:०० वाजेपर्यंत.

प्रस्ताव स्विकारणे / नाकारणे अथवा कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार प्राधिकरणाने आरक्षित केले आहेत.

सही/-
**अतिरिक्त महानगर आयुक्त – १**
**व प्रकल्प संचालक**
**मुं.म.प्र.वि. प्राधिकरण**

**दिनांक :** ६.०५.२०२५
**ठिकाण:** मुंबई.
**क्र.:** PD/NTDA/Office space RFP/७५५/२०२५



### उरण नगरपरिषद
### कोटेशन नोटीस

जा.क्र. उनप/बांवि./२२८/२०२५ २०२६
उरण नगरपरिषद,
उरण, दिनांक :- ५/५/२०२५

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी एजन्सी, तांत्रिक सेवा पुरवठादार/कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा / दरपत्रके मागवित आहे. निविदा/ दरपत्रक दिनांक १३/०५/२०२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | बयाना रक्कम | निविदा फॉर्म फी रुपये |
|---|---|---|---|
| १ | उरण नगरपरिषदेचे बांधकाम, तसेच इतर खात्याअंतर्गत रस्ते दुरुस्ती, खड्डे भरणे, शौचालय दुरुस्ती इ. कामांकरीता मटेरियल व मनुष्यबळ पुरविणे. | २,०००/- | रु. ५००/- |

उपरोक्त कामी नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४ /नवि-१६, दिनांक ०४ जून २०१८ अन्वये शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा / दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदर कामाच्या अटी/शर्ती बांधकाम विभागातून माहितीकरिता उपलब्ध असून इच्छूक ठेकेदारांनी बांधकाम विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

सही/-
**(समीर जाधव)**
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद,उरण



अर्जदारातर्फे वकील ॲड. उज्वला तेटगुरे

### मे.दिवाणी न्यायाधिश व. स्तर पनवेल यांचे कोर्टात

चौकशी अर्ज क्र.५५१/२०२५

श्रीमती अपर्णा अनंत खडतर व इतर ......... अर्जदार

### जाहीर नोटीस

ने.ता. १०/०६/२०२५
नि. ६/ड

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी कै. अनंत रामचंद्र खडतर हे दिनांक ०४/०४/२०२३ रोजी विलेपार्ले वेस्ट, ग्रेटर मुंबई, मुंबई, ४०००५६ येथे त्यांच्या राहत्या घरी निधन झाले आहे – कै. अनंत रामचंद्र खडतर यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पूढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत सर्व्हे नं. २२ हिस्सा नं. १३अ, प्लॉट नं. १,२,३ क्षेत्र ११२३.८ चौ. मी. यावर बांधण्यात आलेली लोटस अपार्टमेंट या इमारतीमधील पहिला मजला, सदनिका नं. १०४, क्षेत्र ३५.९१ चौ. मी. कार्पेट**

मयत कै. अनंत रामचंद्र खडतर यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै. अनंत रामचंद्र खडतर यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक ०५/०५/२५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**लिपिक**
दिवाणी न्यायालय (व स्तर)
पनवेल, जिल्हा रायगड

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय (व स्तर)
पनवेल, जिल्हा रायगड



### कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता. अंबरनाथ जि. ठाणे.

जा.क्र : कुबनप/नगरोत्थान/साबां/१४३/२०२५-२६ दिनांक : ५/०५/२०२५

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ७/२०२५-२६**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२४-२५ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ११ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.२/०५/२०२५ ते दि.९/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून दि. ५/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई-निविदा दि.१३/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**(मारुती गायकवाड)**
मुख्याधिकारी तथा
प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद



### कागदपत्रे हरविलेबाबत

मी, श्री. जयेश रोशन जैन, रा. मु. पो. सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स, बिल्डिंग नं. २, प्लॉट नं. सी.टी.एस. नं. ४३३, पनवेल, जि. रायगड.

माझेकडून तळोजा येथे प्रवास करित असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी नवीन पनवेल शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून, त्याचा मिसिंग रजि. नं. ०१२२/२०२५, दि. ११/३/२०२५ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांच्याकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. शेअर सर्टीफिकेट, तळोजा फेज ०१, नं. ०७
शेअर अकाऊंट नं. ००६१ ते ००७०

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ८८५०१४१९२६ वर संपर्क साधावा.

दिनांक : ५/५/२०२५

**सही/-**
(जयेश रोशन जैन)



### कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता. अंबरनाथ जि. ठाणे.

जा.क्र : कुबनप/नगरोत्थान/साबां/१५३/२०२५-२६ दिनांक : ५/०५/२०२५

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ११/२०२५-२६**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२४-२५ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ०३ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.५/०५/२०२५ ते दि.१३/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून दि. ०७/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई-निविदा दि.१४/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**(मारुती गायकवाड)**
मुख्याधिकारी तथा
प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ०८/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरूस्ती..... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्रातील कार्यालय व कर्मचारी निवासस्थानांचे पुनर्बांधणी करणे. | ₹ १६,१०,४६७.०० |
| २. | अलिबाग प्रदेशाशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...........नागोठणे येथील अशुद्ध जलउदंचन केंद्रामध्ये बसवलेल्या १०१० केव्हीए क्षमतेच्या डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर सेटची दुरुस्ती करणे. | ₹ ३८,२३,५०४.०० |
| ३. | पोलादपूर धरण... पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती........ पोलादपूर येथील सावित्री धरण गॅलरीची तपासणी व पाण्याखालील व्हिडिओग्राफी करणे. | ₹ ६,३०,०००.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०८/०५/२०२५ ते दिनांक २२/०५/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १३/०५/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १५/०५/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



### हेटवणे मध्यम प्रकल्प बुडीत क्षेत्र

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड

**जाहीर नोटीस**

क्रमांक :- उविअ/भूसं./कात-१/हे.म.प्र./वाकरुळ/नोटीस/२०२५,
दिनांक : २९/०४/२०२५

ज्याअर्थी हेटवणे मध्यम प्रकल्प बुडीत क्षेत्रासाठी मौजे वाकरुळ, ता. पेण, जि. रायगड येथील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करणेबाबत शासन निर्णय महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-०३/२०१५/प्र. क्र. ३४/अ-२, दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ व शासन परिपत्रक दिनांक २५/०१/२०१७ हेटवणे मध्यम प्रकल्पामधील तरतुदी अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली यांचेद्वारे व यांचे नाव घेणेबाबत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

आणि त्याअर्थी, मा.जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेश क्र. भूसंपादन/टे-६/१७९७८६३/मौजे वाकरुळ/२०२४ दिनांक १९/०४/२०२४ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ आणि तद्नुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एल. क्यू. एन. ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/०१/२०१७ व शासन शुध्दीपत्रक दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ अन्वये कार्यवाही करणेची आहे. त्याअर्थी आता,

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी श्री. प्रविण पवार, उपविभागीय अधिकारी पेण या द्वारे, अ. अनुसूची – एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली यांच्याद्वारे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

ब. प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी करताना जिल्हा स्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेड्यूल-१ च्या तरतुदीनुसार संपादित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देवून, मोबदला निश्चित करण्यात येईल.

क. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणांप्रमाणे खाजगी वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली यांचेद्वारे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भूधारकांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी पेण यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी पेण यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी पेण यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**तालुका :- पेण** **जिल्हा :- रायगड**

| अ. क्र. | गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर./पो.ख. | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाकरुळ | ३५६ | ० | ०.१७.०० | ०.१७.०० |
| **एकूण** | | | | **०.१७.००** | **०.१७.००** |

दिनांक :- २९/०४/२०२५
ठिकाण :- पेण

**सही/-**
**(प्रविण ज्ञानु पवार)**
उपविभागीय अधिकारी पेण
उपविभाग पेण

क्र.: जिमाका/राअ/जाहि./४३/२०२५-२६



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ०७/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | महाड औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती..नांगलवाडी कॉलनी परिसरातील मनोरंजन हॉलची दुरुस्ती करून रंग लावणे. (दुसरी मागणी) | ₹ ३९,०३,२९५.०० |
| २. | खांदा कॉलनी येथील निवासी इमारतींची देखभाल व दुरूस्ती...... खांदा कॉलनी पनवेल येथे निवासी कर्मचारी निवासस्थानांची अंतर्गत दुरुस्ती करणे. (दुसरी मागणी) | ₹ २१,०५,३२१.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०८/०५/२०२५ ते दिनांक १९/०५/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०८/०५/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०९/०५/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# नवी मुंबईत अनधिकृत बांधकाम, झोपड्यांवर महापालिकेची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात बेघर हटविणेसाठीची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई कार्यक्षेत्रातील बेलापूर विभागाअंतर्गत अे विभाग कार्यालय बेलापूर मार्फत बेघर हटविणेसाठी कारवाईचे आयोजन करुन, ढ ब्रिज खालील सेक्टर-४२, सिवूड्स, नवी मुंबई, येथील ४८ बेघर हटविण्यात आले. सदर मोहिमेकरीता मजूर-०८, वाहन आयचर-०१ यांचा वापर करण्यात आलेला आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील, नेरुळ सेक्टर-२५ मलनिसनण: केंद्रच्या मागे असलेल्या अनधिकृत झोपडया स्वत:हून हटविने आवश्यक होते.

अे विभाग कार्यालय बेलापूर मार्फत तोडक कारवाईचे आयोजन करुन, नेरुळ सेक्टर-२५ मलनिसनण: केंद्रा च्या मागे असलेल्या २५ अनधिकृत झोपडया निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. तसेच तसेच, ब्रिज खालील सेक्टर-४२, सिवूड्स, नवी मुंबई, येथील बेघर हटविण्यात आले.

या दोन्ही धडक मोहिमेसाठी बेलापूर विभागाचे या धडक मोहिमेसाठी बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे, कनिष्ठ अभियंता आत्माराम काळे, अे विभाग बेलापूर येथील अधिकारी/ कर्मचारी तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते. सदर मोहिमेकरीता जेसीबी - ०१, मजुर - १०, आयचर वाहन - ०१ यांचा वापर करण्यात आलेला आहे. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# डॉ. डी.वाय. पाटील स्टेडियम परिसरात रात्री विशेष स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ शहर ही नवी मुंबईची देशभरात ओळख असून त्यादृष्टीने डी. वाय. पाटील स्टेडियम येथे ''वेव्हज् २०२५' अंतर्गत संपन्न झालेल्या जगप्रसिद्ध संगीतकार ए.आर.रहमान यांच्या 'वंडरमेट' या वैश्विक प्रीमियर लाईव्ह संगीतमय कार्यक्रमाप्रसंगी हजारो दर्शक उपस्थित होते. त्यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमानंतरच्या स्टेडियम बाहेरील रस्ते व परिसर स्वच्छतेचे पूर्वनियोजन केले होते.

त्यास अनुसरून अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ एक उपायुक्त डॉ.अजय गडदे, परिमंडळ १उपायुक्त सोमनाथ पोटरे व बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ अमोल पालवे यांनी याकडे विशेष लक्ष देत या परिसरात रात्रीच विशेष स्वच्छता मोहीम राबविली.

या मोहिमेमध्ये मुख्य स्वच्छता अधिकारी श्री.संजीव शेकडे व स्वच्छता अधिकारी नरेश



अंधेर यांच्यासह ४ स्वच्छता निरीक्षक, ३ स्वच्छता पर्यवेक्षक व ५४ स्वच्छतामित्रांनी हा संपूर्ण परिसर स्वच्छ केला. त्याचप्रमाणे त्यांनी संकलित केलेला कचरा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहून नेण्यासाठी ३ टाटा एस कचरा वाहतूक वाहने कार्यरत होती. त्यावर कचरा वाहतूक व्यवस्थापक आणि ९ स्वच्छताकर्मींनी लगेचच कचरा वाहून नेला. पूर्वनियोजन करून रात्रीच राबविण्यात आलेल्या या विशेष स्वच्छता मोहिमेमुळे सकाळी स्वच्छ रस्ते पाहून नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# खरीप हंगामाची तयारी सुरू

## पावसाचे वेळेत आगमन होणार असल्याने बळीराजाला दिलासा



*खरीप हंगामाच्या अनुषंगाने दि.५ में रोजी कृषी विभागाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.*

**-टी एन दौलतोडे**
**(कृषी अधिकारी,पनवेल)**

**खारघर : प्रतिनिधी**

यंदा पावसाचे शुभवर्तमान व वेळेआधी आगमन होत असल्याने बळीराजा सुखावला आहे. पावसाअगोदरच शेतकरी धूळ पेरणी करतो.मागील वर्षी पनवेल तालुक्यात ४७ हजार १८४ हेक्टर क्षेत्रात खरीप पिके घेण्यात आली होती.यावर्षी देखील शेतकरी तयारीला लागले असुन धुळपेरणीचे असून शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी सुरू केली आहे.

मागील वर्षी खरीप पिके घेणारी २९७११ खातेदार होते. यंदाही शेतकऱ्यांनी बी बियाणे, खतांची जमवाजमव सुरू केली आहे. पनवेल तालुक्यात कृषी क्षेत्र झपाट्याने कमी होत चालले असले तरी शेती करणाऱ्यांची संख्या आद्यपही मोठ्या प्रमाणात आहे.

खरिपाची बेगमी आणि शेतीच्या कामांवर अखेरचा हात अशी सध्या लगबग शिवारात आहे. खते, तणनाशके, इतर घरगुती आगोटीचे सामान आणि सुधारीत बी बियाणांची खरेदीसाठी शेतकरी शहराकडे धाव घेत आहेत.खते व कीटकनाशकांच्या गुणवत्ता नियंत्रण व पुरवठाबाबत शेतकऱ्यांना क्षेत्रीय स्तरावर अडचणी येतात.या अडचणींचा विचार करून त्या कशा सोडविल्या जातील याबाबत गांभीर्याने विचार करायला हवा. तालुक्यात सर्वाधिक भातशेतीच घेतली जाते. त्यापाठोपाठ भाजीपाला आणि कडधान्य पीक घेतले जाते.

# ३६.३०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त

## पालिकेची प्लास्टिकविरोधी मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

एकल वापर प्लास्टिकचा व त्यातही प्राधान्याने प्लास्टिक पिशव्यांचा वापर नागरिकांकडून थांबावा याकरिता महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे तसेच पर्यायी कापडी व कागदी पिशव्यांचा वापर केला जावा यावर भर देण्यात येत आहे.

या अनुषंगाने परिमंडळ २ विभागाचे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली परिमंडळ २ च्या भरारी पथकाला विशेष तपासणी मोहीमेत मागील ४ दिवसात ६ व्यावसायिकांकडे प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळल्याने त्यांच्याकडून प्रत्येकी ५ हजार प्रमाणे ३० हजार रक्कमेची दंडात्मक वसूली तसेच ३६ किलो ३०० ग्रॅम प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे.

यामध्ये परिमंडळ २ च्या प्लास्टिक प्रतिबंधात्मक भरारी पथकाने १ मे रोजीच्या महाराष्ट्र दिनी मुलुंड ऐरोली टोलनाका येथे मुंबईतून नवी मुंबईत दुचाकीवरून आणला जाणारा प्लास्टिक पिशव्यांचा ३० किलो साठा जप्त केला असून राजेश गुप्ता यांच्याकडून ५ हजार दंडात्मक रक्कम वसूल केलेली आहे.

त्याचप्रमाणे, ३० एप्रिल रोजी या भरारी पथकाने घणसोलीगाव येथील शिवशक्ती स्टोअर्स यांच्याकडे प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळल्याने १ किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त केला असून ५ हजार दंड वसूली केलेली आहे. तसेच घणसोली येथील पुजा ट्रेडर्स या व्यावसायिकाकडून ५ हजार दंड वसूली तसेच ५०० ग्रॅम प्लास्टिक पिशव्या जप्त केलेल्या आहेत.



३ मे रोजीही सेक्टर १ कोपरखैरणे येथील डी. आर.भानुशाली अँड सन्स यांचेकडे प्लास्टिक पिशव्या वापरात असल्याचे आढळून आल्याने ५ हजार दंडात्मक रक्कम वसूली तसेच १ किलो प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आलेल्या आहेत. या परिमंडळ २ च्या भरारी पथकानेच सेक्टर १ येथील थोरात बंधू किराणा स्टोअर्स यांचेकडून तसेच महालक्ष्मी मार्ट सेक्टर ६ ऐरोली यांचेकडून प्लास्टिक पिशव्यांचा वापर करीत असल्याने प्रत्येकी ५ हजार दंड रक्कम तसेच अनुक्रमे ३ किलो व ८०० ग्रॅम प्लास्टिक पिशव्या जप्त केलेल्या आहेत.

अशाप्रकारे जनजागृती सोबतच प्लास्टिकमुळे पर्यावरणाला व मानवी जीवनाला होत असलेला धोका लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक एकल वापर प्लास्टिकचा वापर करणा-या व्यावसायिकांकडून तपासणी मोहीमा राबवून दंड वसूली करण्यात येत आहे. तरी प्लास्टिकमुळे निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णत: टाळावा व कापडी /कागदी पिशव्यांचा पर्याय निवडावा तसेच व्यावसायिकांनीही आपल्या वस्तू देण्यासाठी प्लास्टिक पिशव्या देऊ नयेत व प्लास्टिक पिशव्या दुकानात ठेवूच नयेत असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# मैदानी खेळ लोप पावत चालले; ऑनलाईन खेळाकडे मुलांचा वाढता कल

**नवी मुंबई: प्रतिनिधी**

उन्हाच्या सुट्ट्या लागल्या की सर्वत्र लगबग दिसून यायची. मात्र सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागूनही सन्नाटाच दिसून येत आहे .मामाचे पत्र हरविले ते आम्हाला नाही सापडले लपंडाव गोट्या, भोवारा, विटी दांडू, कबड्डी, खो-खो, आट्यापाट्या, क्रिकेट, असे विविध खेळ जणू सध्याच्या मुलांना माहितीच नाही अशी परिस्थिती निर्माण झाली असून मुलांचा कल ऑनलाईन खेळाकडे वळत असल्याचे दिसून येत आहे.

बदलत्या काळानुसार पारंपारिक खेळ देखील लोप पावत चाललेले पाहायला मिळत आहे. सध्याच्या एकविसाव्या शतकामध्ये मुलांना पारंपारिक खेळ जणू काही माहितीच नाही असे दृश्यच निर्माण झाले आहे. प्रत्येक मुलाच्या हातात स्मार्ट मोबाइल दिसत असल्यामुळे सध्याच्या मुलांचा कल हा ऑनलाइन गेम खेळण्याकडे जास्त दिसत आहे.

पूर्वी सुट्टी लागताच लहान मुले एकत्र जमून विविध खेळ खेळत. त्या खेळांचा गोंगाट कानावर पडायचा. मात्र सध्या तसे नसून सर्वत्र शांतता पसरलेली दिसून येत आहे.विज्ञान जसजशी क्रांती घडवत गेलं तसतसा माणसांमध्ये सुद्धा बदल होत गेला आणि सध्या शहरी भागामध्ये उन्हाळा शिबिर चालवण्याची पद्धत उदयास आली आहे. उन्हाळा शिबिर हे लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी नसून पैसे कमविण्याचे एक नवीनच फॅड निर्माण झाले आहे. पूर्वी मैदानी खेळ खेळून शरीर सुदृढ धष्टपुष्ट बनायचे. मात्र सध्या ऑनलाइन गेम ने मुले कमकुवत बनत चाललेली आहेत

मुलांना मोबाईल कॉम्प्युटर वरील गेमची इतकी आवड निर्माण झाली आहे की,त्यांना एक प्रकारचे व्यसन लागलेली आहे .जर ऑनलाईन गेम उपलब्ध करून दिला नाही तर मुलांमध्ये चिडचिडेपणा वाढू लागला आहे. अनेक मुलं तर मोबाईल शिवाय जेवत देखील नाहीत अशी भयानक परिस्थिती सध्याच्या काळात निर्माण झाली आहे.

कॉम्प्युटर समोर तासं-तास बसल्यामुळे लहानपणीच मुलांना चष्मे लागत आहे. शरीराची पुरेसी वाढ न होणे भूक न लागणे, चिडचिडेपणा अशा आरोग्याच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लपंडाव, खो-खो, कबड्डी, क्रिकेट ,आट्यापाट्या अशा विविध खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम होत होता. यामुळे मुलांचे आरोग्य देखील सुदृढ राहत होते.

शहरी भागामध्ये तर मैदानी खेळ खेळण्यासाठी मैदाने कमी पडायला लागली आहेत. त्यात फ्लॅट संस्कृती सगळी कडे रुजत आहे. खेळण्यासाठी मैदान आता राखून ठेवावी लागत आहेत. त्यातही मुलांना खेळण्यासाठी तासाला पैसे मोजावे लागतात. खेळण्यामध्ये सुद्धा लोकांनी पैसा आणि धंदा शोधून काढला आहे.

# प्रबोधनात्मक पथनाट्यांचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५' विषयी सविस्तर माहिती मिळावी तसेच लोकसेवा नागरिकांना सुलभ व सहज रितीने उपलब्ध व्हाव्यात या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका राबवित असलेल्या कार्यप्रणालीबाबत जनजागृती व्हावी यादृष्टीने सेवा हक्क दिनाचे



औचित्य साधून २८ एप्रिल रोजी महापालिका क्षेत्रात विविध ठिकाणी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना आवश्यक असणा-या लोकसेवा सुलभ रितीने उपलब्ध व्हाव्यात याकरिता ऑनलाईन प्रणालीचा प्रभावी वापर केला जात आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या ु.पााल.सीं.ळप या संकेतस्थळाप्रमाणेच माझी नवी मुंबई - चू छ्चचउ या पवरही या लोकसेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत. यामध्ये जन्म, मृत्यू, विवाह नोंदणी अशा विविध ६८ लोकसेवा ऑनलाईन पुरविण्यात येत आहेत.

या लोकसेवांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता यावी यादृष्टीने मनोरंजनातून प्रबोधन करणार-या पथनाट्यासारख्या लोकप्रिय व प्रभावी माध्यमाचा समर्पक वापर महापालिकेच्या वतीने करण्यात आला.

क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने लोकसेवांबाबत माहितीप्रद विशेष पथनाट्याचे सादरीकरण महापालिका क्षेत्रात मुख्यालयाप्रमाणेच मॉल, स्टेशन परिसरात करण्यात आले. आरंभ इव्हेन्ट्सतच्या अक्षय खांबे, शौनका पोळ, धीरज सोडिये, आशिष कदम, प्रतीक घाडगे, शुभम भोबस्कर या कलावंतांनी सादर केलेल्या पथनाट्याला सर्व ठिकाणी नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

# २३० सफाई मित्रांना पीपीई किटचे वाटप


**नवी मुंबई : बातमीदार**

आयकिया व कॅम्प फाऊंडेशन यांनी पुढाकार घेत व सामाजिक बांधिलकी जपत महानगरपालिकेच्या सुरक्षित स्वच्छता अभियानाला २ सक्शन वाहने देऊन तसेच सफाई मित्रांना प्रशिक्षण देऊन जे योगदान दिले आहे त्या सहयोगी भूमिकेची महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी प्रशंसा केली.

कॅम्प फाऊंडेशनच्या माध्यमातून आयकिया फर्निचर मॉलच्या सीईआर निधी अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेस २ हजार लीटर क्षमतेची २ सक्शन वाहने देण्यात आली

केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय यांच्या नमस्ते योजनेच्या माध्यमातून २३० पीपीई किट व प्रशिक्षण पूर्णकरणा-या ना प्रशस्तीपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.


वर्ष १२ वे | ।। ॐ बाळकृष्णाय नम:।। | स्थापना २०१४




श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरू भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर)
पिताजी
**श्री. चांगू काना ठाकूर**



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर)
माताजी
**श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर**



श्री समर्थ सद्गुरू दादामहाराज (मुंबई)

## बारावा पुण्यतिथी सोहळा

आपणांस कळविण्यात येते की, आमच्या माताजी स्वानंद सुख निवासी **'श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर'** यांची बारावी पुण्यतिथी मिती वैशाख शु. १२, शके १९४७ **शुक्रवार दि. ०९/०५/२०२५** रोजी **सकाळी १०.०० वा. श्री. स. स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर,** यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथाचे पारायण श्री दासबोध वाचण पर्वणी प्रारंभ, मिती वैशाख शु. १३, **शनिवार दि. १०/०५/२०२५** रोजी दुपारी १२.०० वा. पुण्यतिथी निमित्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधु भगिनीनी उपस्थित रहावे, ही विनंती.

**शनिवार, दिनांक १०/०५/२०२५**

| | |
|---|---|
| **सकाळी ०९.०० ते १०.०० - भजन** | नादब्रम्हा भजन मंडळ, रांजणपाडा (खारघर)<br>बुवा : श्री. निवृत्ती बुवा चौधरी,वसंतशेठ पाटील-कोपर,<br>ज्ञानेश्वर म्हात्रे-गव्हाण, गणपत ठाकूर- कोपर, भाऊ ठाकूर,<br>सुरेश ठाकूर-शि.नगर, नितीन ठाकूर- त. पाडा,<br>श्री. महेश पाटील, न्हावा, पखवाज : निलेश पाटील |
| **सकाळी १०.०० ते १२.००** | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| **दुपारी १२.०० वाजता** | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

**कार्यक्रमाचे ठिकाण**

**श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर**
**मु.शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५**

**व्यवस्थापक**

**देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)**
**शिवाजीनगर- गव्हाण-न्हावेखाडी- कोपर (संचलित)**

**संयोजक**

**श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार) आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर**


# 'उत्सवामुळे मानवाचे भाग्य बदलते'

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आपण जेवढा मोठा उत्सव केला की, उत्सव आपणांस मोठे करीत असतो. हीच मोठी श्रीमंती असून गाडी, दागिणे, राजवाडा हे सर्व नश्वर असून उत्सव हे शाश्वत आहे. उत्सवाला आलेले वारकरी व त्यांच्या कुटुंबाचे भाग्यच बदलत असते. जिवनात देव आणी संत दिशा दाखवित असतात. यामुळे जिवनात उत्सव केले पाहिजेत ही भारतीय संस्कृती असून तिचे जतन करा यामुळे या उत्सवामुळे मानवी जिवनांचे भाग्य बदलत असते, असे प्रबोधन रामदास भाई महाराज पाटील यांनी रसायनी पाताळगंगा येथील वारद येथे रविवारी (दि.४) अखंड भक्ती रसामृत यज्ञोत्सव



सोहळा च्या काल्यांच्या किर्तनात बोलतांना व्यक्त केले.

दरम्यान, दीपोत्सवाच्या वेळी या ठिकाणी सामाजिक सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, वारकरी आश्या विविध माध्यमातून या ठिकाणी उपस्थित होते. या यज्ञोत्सवाचे आयोजन हनुमंत विष्णू लभडे, ज्ञानेश्वर महाराज पाटील (खानाव) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. हे चतुर्थ वर्ष असल्यामुळे या कार्यक्रमास यात्रे सारखे प्रचंड स्वरूप प्राप्त झाले होते. मुखात विठ्ठलांचे नावाचा गजर, आणि टाळ्यांचा कडकडाटाने हा परिसर दुमदुमून गेला. या वेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आले तसेच पसायदाने या कार्यक्रमाची सांगता करण्यांत आली.

या वेळी भाई महाराज पुढे म्हणाले की, संत तुकाराम महाराज यांच्या गाथा पाण्यात बुडविल्या मात्र त्या पाण्यावरती तरंगल्या, अभंग विचारांना प्रेरणा देत असतात. गोग्य दिशेने पाउल टाकले तर यश मिळते तर आयोग्य पद्धतीने टाकले तर अपयश मिळते.त्याच बरोबर जिवन तृप्त होण्यांसाठी संताच्या दिलेल्या मार्गावर चालावे तसेच चुकीची संगत ही घातक ठरू शकते. माणुस हा दिशाहीन होत चालला आहे. सोळाव्या शतकातील काल सुवर्ण काळ मानला जात होता. कारण छत्रपती शिवाजी महाराज प्रशासक होते तर संत तुकाराम महाराज प्रबोधन करीत होते.

ज्या गावामध्ये आध्यामिक सोहळा होतो. त्या गावाचा दर्जा वाढतो. सोयरे संबध जोडले जातात. कुटुंब सुखी होतात. येणारे संकट टळले जाते, असे उत्सवाचे महत्त्व आहे. आज पाण्यांचे संकट गडद होते चालले असून श्री कृष्णाने कालीया डोह शुद्ध करुन पाणी पिण्यायोग्य केले तसेच पर्यावरण वाचविण्यांचा संदेश दिला. गोवर्धन पुजण्यांस सांगितले आपल्याजवळ असलेली संपत्ती म्हणजे गायी वासरे, असे मत काल्यांच्या किर्तनात वारद येथे व्यक्त केले.

# मुरुडमध्ये खरीप हंगामपूर्व शेतकरी कार्यशाळा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका कृषी अधिकारी कार्यालय व पंचायत समिती कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने खरीप हंगामपूर्व शेतकरी कार्यशाळेचे आयोजन पंचायत समिती सभागृह येथे सोमवारी (दि.५) करण्यात आले होते. या कार्यशाळेस तालुक्यातील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष उपस्थित होते.



खरीप हंगामाच्या तयारीच्या दृष्टीने भात बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी, चारसुत्री पद्धतीने भात लागवड, गटशेतीचे फायदे, भात बीजप्रक्रिया व त्याचे महत्त्व, सेंद्रीय शेतीचे महत्त्व तसेच कमी पाण्यामध्ये फळबागेचे पाणी व्यवस्थापन करण्याविषयी सीआरए तंत्रज्ञान, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न पक्रिया उद्योग, ग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत फळबाग लागवड, शेततळे इ. विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

पाणी फाऊंडेशनचे प्रमुख सदस्य सुभाष पोळ यांनी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गटामार्फत शेती केल्यास उत्पादन खर्च कमी होऊ शकतो व पर्यायी उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असे सांगितले तसेच पाणी फाऊंडेशनव्दारे चालवल्या जाणाऱ्या डिजिटल शेतीशाळा या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कृषी सहाय्यक मनोज कदम यांनी घरगुती बियाण्याला मिठाच्या द्रावणाची आणि बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी उपसंचालक प्रवीण ठिगळे, तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ, मंडळ कृषी अधिकारी प्रमोद नरळे, कृषी पर्यवेक्षक रवींद्र सैंदाणे, कृषी विभागातील इतर सर्व कृषी सहाय्यक तसेच पंचायत समितीमधील कृषी विस्तार अधिकारी राखी खोपकर, कृषी पर्यवेक्षक रवींद्र सैंदाणे, कृषी सहाय्यक आदिराज चौलकर, मनोज कदम, अतुल उपाध्ये, प्रगतीशिल शेतकरी तुकाराम पाटील, अनंत कांबळे, सुनील घाग आदी उपस्थित होते.

कार्यकमाचे प्रमुख अध्यक्ष कृषी उपसंचालक प्रवीण ठिगळे यांनी कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्याचे तसेच डिजिटल शेतीशाळेमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घेण्याचे आवाहन केले.

# घोडपापड येथे जलयोजनेचे लोकार्पण

## मंगला प्रभुखानोलकर फाउंडेशनकडून दिलासा



**सुधागड : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील रा.जि.प. शाळा घोडपापड येथे जलयोजना (बोअरवेल) लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. ही वाडी आदिवासी कातकरीवाडी असल्यामुळे येथील रहिवाशांना आणि शाळेतील विद्यार्थ्यांना पाण्याच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत होते. मंगला प्रभुखानोलकर फाउंडेशनच्या मदतीने बोअरवेलच्या स्वरूपात जलस्रोत उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे या भागातील नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

उपक्रमासाठी मंगला प्रभुखानोलकर फाउंडेशनकडे बोअरवेलची मागणी प्रस्तावित करण्यात आली. फाउंडेशनचे संस्थापक काकासाहेब प्रभुखानोलकर यांनी ही मागणी मान्य केली आणि शाळेच्या परिसरात बोअरवेल खोदून मोटर बसवण्याची व्यवस्था केली. ऐन उन्हाळ्यात पाणी उपलब्ध करून देण्यात आल्याने वाडीतील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

लोकार्पण सोहळयाचे उद्घाटन मंगला प्रभुखानोलकर फाउंडेशनचे विश्वस्त सुनील वालावलकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्यासह शिक्षण केंद्रप्रमुख आनंदा पाटील तसेच सुशील मालुसरे व हरिचंद्र वाघमारे यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात रमेश पवार आणि रवी पवार यांनी गावातील समस्यांचा आढावा घेतला तसेच सरपंच पांडुरंग शेंडे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य दत्ता वाघमारे, फाउंडेशनचे किशोर तांडेल, मनीषा वालावलकर यांनी उपस्थित राहून योगदान दिले.

उपक्रमाचे नियोजन करण्यासाठी फाउंडेशनचे व्यवस्थापक चंद्रशेखर धुरी आणि शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत फुंदे यांनी भूमिका निभावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका दिशा दुभेले यांनी केले. मुख्याध्यापक फुंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# शिक्षकांसह शाळांनाही 'आदर्श' दर्जा मिळणार; निवडीसाठी तीन स्तरावर समिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

शालेय शिक्षणात वेगवेगळे प्रयोग करून दर्जेदार शिक्षण प्रणाली उभी करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, त्याच अनुषंगाने राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने राज्यभरातील गुणवत्तापूर्ण अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आदर्श शिक्षक, आदर्श शाळांची निवड करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय आदर्श शाळांची स्वतंत्र बँक करण्यात येणार असून, त्यांना शिक्षण विभागाच्या कामकाजात सहभागी करून घेतले जाणार आहे.

सरकारी व खासगी शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे अनेक शिक्षक आहेत. अशा शिक्षकांचा उपयोग शालेय विकासात करण्याचा सरकारचा उद्देश आहे. चांगल्या शिक्षकांना प्रोत्साहन देऊन अनुभवाचा उपयोग करून देण्यासाठी आदर्श शिक्षक, आदर्श शाळा ही संकल्पना हाती घेतली आहे. याचा उपयोग भविष्यात इतर शाळांनाही होणार आहे. नवीन अध्ययन पद्धती, शासकीय ध्येय-धोरणांची अंमलबजावणी, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळांमधील भूमिका अशा निकषांवर शिक्षक, शाळेची निवड होणार आहे.

आदर्श शिक्षक , शाळा उपक्रमासाठी तालुका, जिल्हा आणि राज्य अशा तीन स्तरावर समिती नियुक्त करण्यात आली आहे. राज्यस्तरीय समितीत शिक्षण आयुक्त हे समितीप्रमुख असतील. विविध निकषांवर समितीकडून शिक्षक आणि शाळांचे मूल्यमापन केले जाणार आहे. आदर्श शिक्षक, शाळांना शिक्षण विभागाच्या कामकाजात सहभागी करून घेण्याचेही नियोजन आहे.

# कोमसाप मुरूड शाखेला साहित्यसंपदा पुरस्कार प्रदान



**मुरूड : प्रतिनिधी**

मराठी भाषा संवर्धन, मराठी साहित्य प्रचार आणि प्रसार या हेतूने स्थापन झालेल्या साहित्यसंपदा संस्थेतर्फे मराठी संवर्धन, प्रचार-प्रसारासाठी सातत्याने योगदान देणाऱ्या व्यक्ती, संस्था यांचा सन्मान साहित्यसंपदा दीपस्तंभ पुरस्कार देण्यात येतो. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून २०२५चा पुरस्कार कोकण मराठी साहित्य परिषद मुरुड शाखेला प्रदान करण्यात आला.

सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. कोमसाप मुरूड शाखा साहित्यिक, सामाजिक उपक्रम राबवित असते. साहित्यसंपदातर्फे राज्यस्तरीय साहित्य संमेलन व पुरस्कार सोहळ्याचे आयोजन अलिबाग येथील आदर्श पतसंस्थेच्या सभागृहात करण्यात आले होते.

संमेलनाला अध्यक्ष ज्येष्ठ गझलकार ए.के. शेख, प्रमुख पाहुणे कोमसाप जनसंपर्क प्रमुख एल.बी. पाटील, कवी-लेखक रमेश धनावडे, साहित्यसंपदा संस्थेचे संस्थापक वैभव धनावडे, नागेश कुलकर्णी, गझलकार रोहिदास पोटे, सुभाष कटकदौंड आदी उपस्थित होते. कोमसाप मुरूड जंजिरा शाखेतर्फे अध्यक्ष संजय गुंजाळ तसेच पदाधिकारी व सदस्य यांनी पुरस्कार स्वीकारला.



**मुंबई : महाड विधानसभा मतदारसंघातील साळवे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संजय शिंदे, गणू तेडगुरे, सदानंद तेडगुरे तसेच मुंबई मंडळाच्या अध्यक्षांसह राष्ट्रवादीच्या अनेक कार्यकर्त्यांनी बाळासाहेब भवन येथे मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमास पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : संतोष सुतार)

# शासकीय निवासी शाळेत मोफत प्रवेश

## इच्छुक विद्यार्थ्यांना अर्जासाठी आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शासकीय निवासी शाळेची प्रवेश प्रक्रिया १ एप्रिलपासून सुरू करण्यात आली आहे. शाळेत प्रवेश घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर सहाय्यक आयुक्त कार्यालय, समाज कल्याण, रायगड-अलिबाग (दूरध्वनी क्र.०२१४१-२२२२८७) किंवा अधिनस्त अनुसूचित जाती नवबौद्ध मुलांकरिता शासकीय निवासी शाळा जावळी ता. माणगाव (मोबाईल नं. ९५११२२८६५४, ९८५०१७०७६२) येथे संपर्क साधावा आणि येथील कार्यालयात उपलब्ध प्रवेश अर्ज विहित नमुन्यात भरुन खालील कागदपत्रांसह सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांनी केले आहे.

सहाय्यक आयुक्त समाजकल्याण रायगड यांच्या अधिनस्त अनुसूचित जाती नवबौध्द मुलांकरिता शासकीय निवासी शाळा जावळी येथे कार्यरत आहे. या शासकीय निवासी शाळेमध्ये इयत्ता सहावी ते दहावीच्या गरीब, हुशार, होतकरू, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.

२९ जून या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती ८० टक्के, अनुसूचित जमाती १० टक्के, विशेष मागास प्रवर्ग दोन टक्के, अपंग तीन टक्के विमुक्त जाती, भटक्या जमाती पाच टक्के या प्रमाणे आरक्षण आहे.

प्रशस्त इमारत व निसर्गरम्य वातावरण, मोफत निवास व भोजनव्यवस्था, शैक्षणिक अभ्यासक्रमानुसार लागणारी वहया, पुस्तके, शैक्षणिक साहित्य, मोफत गणवेश, भव्य क्रीडांगण व क्रिडासाहित्य, विविध स्पर्धा परीक्षेची उत्तम तयारी, सुसज्ज ग्रंथालय व प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, वसतिगृह व शालेय परिसर.

प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला (स्वत:चा नसल्यास वडिलांचा), पालकांचा उत्पन्नाचा दाखला, (वार्षिक उत्पन्न अनुसूचित जाती, व जमाती विद्यार्थ्यांकरिता रु.२,५०,०००चे आत व विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, अपंग घटकातील विद्यार्थ्यांकरिता रु.१,५०,०००चे आत असावे.), रहिवासी दाखला (सरपंच/पोलीस पाटील), विद्यार्थ्यांच्या मागील इयत्ता पास झाल्याचे मार्कशिट, विद्यार्थी संचयी पुस्तिका,अपंग असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंग प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटो (पाच प्रती), आधारकार्ड, विद्यार्थ्यांचे बँक खाते पासबुक, वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक आहे.

# माणगाव निकम ज्युनिअर कॉलेजचा बारावी परीक्षेचा निकाल १०० टक्के

## सकीना सनगे सर्वप्रथम



**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळातर्फे फेब्रुवारी २०२५मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल सोमवारी (दि.५) ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव एजुकेशन ट्रस्ट माणगाव संचालित एस.एस.निकम इंग्लिश ज्युनिअर सायन्स कॉलेजने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली असून कॉलेजचा एकूण निकाल १०० टक्के लागला आहे. सकीना सनगे या विद्यार्थिनीने ८३.५ टक्के इतके गुण संपादन करून कॉलेजमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला.

या कॉलेजमधून युसरा युसूफ राऊत हिने ७८ टक्के गुण संपादन करून द्वितीय आणि झुबैया झुबेर अहमद बंदरकरने ७२.३३ टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावला आहे. या कॉलेजमधून या वर्षी बारावी परीक्षेसाठी एकूण २८ विद्यार्थी बसले होते. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी विशेष श्रेणीत दोन विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १६, तर १० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. मदन निकम, ट्रस्टचे सर्व पदाधिकारी तसेच एस.एस.निकम इंग्लिश स्कूल व जुनिअर सायन्स कॉलेज माणगावच्या प्राचार्य डॉ.संगीता कोकाटे, सर्व शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जिल्ह्यातील सात शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रायगड यांचे अधिनस्त मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह अलिबाग, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह अलिबाग, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह महाड, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह तळा, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह महाड, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह पनवेल, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह पाली अशी एकूण सात शासकीय वसतिगृह कार्यरत आहेत. येथे मोफत प्रवेशासाठी इच्छूक विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण सुनील जाधव यांनी केले आहे.

शासकीय वसतिगृहात गरीब, हुशार,होतकरु, मागासवर्गीय, आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. १० मार्च २०२५च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती ८५ टक्के, अनुसूचित जमाती तीन टक्के, विमुक्त जाती, भटक्या जमाती पाच टक्के, विशेष मागास प्रवर्ग दोन टक्के, आर्थिकदृष्ट्या मागास पाच टक्के याप्रमाणे आरक्षण आहे.

मोफत निवास व भोजन व्यवस्था, शैक्षणिक अभ्यासक्रमानुसार लागणारी वहया, पुस्तके, शैक्षणिक व महाविद्यालयीन प्रवेशिततांकरिता लेखन साहित्याकरिता रु. ४००० शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता, दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता दरमहा रु.६०० निर्वाह भत्ता जिल्हा पातळीवर व रु.५०० निर्वाह भत्ता तालुका पातळीवर, शालेय/महा. शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना गणवेशाचे दोन संचाकरिता गणवेश भत्ता, प्रोजेक्ट रिपोर्ट/शै. सहलभत्ता, ॲप्रनभत्ता अशी वैशिष्ट्ये आहेत.

प्रवेशपात्र विद्यार्थ्याच्या पालकांचे सर्वमार्गानी मिळून वार्षिक उत्पन्न अनुसूचित जाती, व जमाती विद्यार्थ्यांकरिता रु.२,५०,०००चे आत व विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास, अनाथ व अपंग घटकातील विद्यार्थ्यांकरिता रु.१,५०,०००च्या आत असावे, अर्जासोबत तहसिलदार यांचे सहीचा सन २०२४-२५मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक, बँक खात्याची झेरॉक्स, आधारकार्ड झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.

वसतिगृहात राहाणाऱ्या मुला-मुलींकरिता इ. आठवीपासून पुढे मांग, भंगी, कातकरी व माडिया गोंड्या जातीमधील मुलामुलींकरिता इ. पाचवीपासून देण्यात येतो. विहित नमुन्यातील अर्ज वसतिगृहातवरील पत्यावर विनामूल्य उपलब्ध आहेत.

अधिक माहितीकरिता सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, रायगड-अलिबाग या कार्यालयाशी अथवा संबधित गृहपालांशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# स्टेशन ठाकूरवाडी शाळा सौरदिव्यांनी उजळली

## चिराग फाऊंडेशनने जपली बांधिलकी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात पुणे जिल्ह्यालगतचे शेवटचे गाव असलेल्या स्टेशन ठाकूरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे आवार सौरदिव्यांनी उजळून गेले आहे. चिराग फाऊंडेशनने या शाळेसाठी सहा सौरदिवे दिले आहेत.



मुंबई-पुणे रेल्वेमार्गावर स्टेशन ठाकूरवाडी हे गाव असून बीड ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या या गावातील रायगड जिल्हा परिषदेची शाळा रात्रीच्या वेळी अंधारात असे. शाळेच्या परिसरात मोठी मोकळी जागा असूनदेखील रात्री अंधार असल्याने तेथे गप्पा मारण्यासाठी किंवा खेळ खेळण्यासाठी कोणालाही बसता येत नाही. ही समस्या चिराग फाऊंडेशनकडे प्रयोगशील शिक्षक वेच्या गावित यांच्याकडून उपस्थित करण्यात आली होती. त्यानंतर चिराग फाऊंडेशनचे काही पदाधिकारी स्टेशन ठाकूरवाडीमध्ये आले आणि त्यांनी गावाची पाहणी केली. गावात वीज आहे, पण गावातील लोकवस्तीमधील चौक हे कायम अंधारात आहेत तसेच शाळेच्या आवारातील अंधार पाहून एक नाहीतर चक्क सहा सौर ऊर्जेवर चालणारे दिवे भेट देण्याचा निर्णय फाउंडेशनने घेतला.

# पक्ष्यांसाठी पाणवठे, गच्चीवर पाणी भरून ठेवण्याचे पक्षीप्रेमींकडून आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस उष्णतेचे प्रमाण वाढत चालले असून मुरूड तालुक्यातील बहुसंख्य गावात दुपारी १२नंतर ३८ डिग्री सेल्सियस तापमान असते. अशा कडक उन्हाळ्याच्या झळा मानवाप्रमाणे पशू-पक्षी व वन्यजीव यांनाही सहन कराव्यात लागत आहेत.

सध्या माणसांप्रमाणेच पक्ष्यांनाही मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. उष्ण तापमानात विहार करताना पक्ष्यांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. पक्ष्यांना डिहायड्रेशन होऊन ते जमिनीवर खाली पडतात. यात त्यांना स्वतःचा जीवही गमवावा लागत आहे. त्यामुळे



पक्ष्यांचे संरक्षण होण्यासाठी पाणवठे तसेच आपल्या परसबागेत अथवा गच्चीवर घरातील कोणतेही भांडे पाण्याने तुडूंब भरून ठेवावे, जेणेकरून पक्षांच्या पाण्याची सोय होऊन त्याचा जीव वाचवणे शक्य होणार आहे. यासाठी पक्षीप्रेमींनीही स्वतः पुढाकार घेऊन पक्ष्यांच्या पाण्याची सोय उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन पक्षीप्रेमी संघटनेकडून करण्यात आले आहे.

शहरी भागात पक्ष्यांची अन्नसाखळी तुटल्यामुळे अन्नाच्या शोधात पक्षी दूर अंतरावर उडत जातात. त्यामुळे त्यांना पाण्याची गरज भासत असते. येत्या काही दिवसात उन्हाचा पारा अधिक वाढणार असल्याने पक्ष्यांसाठी शहरी भागात अथवा ग्रामीण भागात घराच्या बाजूला पाणवठे अथवा बागेत, नारळ-सुपारी बागेत, शेत जमिनीत पक्षांना पाणी मिळेल अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

याबाबत पक्षीप्रेमी संदीप घरत यांनी सांगितले की,प्रचंड उष्णता वाढली की माणसांप्रमाणे पक्ष्यांनासुद्धा मोठा त्रास सहन करावा लागत असतो. पाण्याचे स्रोत आटत चालल्याने पक्ष्यांना पाणी मिळणे दुरापास्त होते. अशा वेळी मानवाने पक्ष्यांवर दया करून आपल्या गच्चीवरील मोकळ्या जागेत संपूर्ण भांडे पाण्याने भरून ठेवावे. त्याचप्रमाणे शेतीचे रानमाळ, बागायत जमीन अशा ठिकाणी कोणतेही भांडे पाण्याने तुडूंब भरून ठेवावे, जेणेकरून पक्ष्यांना पाणी मिळू शकेल.

# पंजाबचा लखनऊवर दणदणीत विजय

**धरमशाला : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्सने धरमशालाच्या घरच्या मैदानावर लखनऊ सुपर जायंट्सवर दणदणीत विजय मिळवत प्लेऑफच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे, तर लखनऊ संघाला आता प्लेऑफसाठी रस्ता खूप अवघड असणार आहे.

पंजाब किंग्सने दिलेल्या २३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊची सुरुवात खूप खराब झाली. अर्शदीप सिंगने पॉवरप्लेमध्ये मुख्य तीन फलंदाजांना माघारी धाडले. मिचेल मार्श आणि एडन मारक्रम तिसऱ्या षटकात बाद झाले, तर निकोलस पुरन पाचव्या षटकात बाद झाला. यानंतर ऋषभ पंतने संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण तो १८ धावा करत बाद झाला, तर डेव्हिड मिलर ११ धावा करत बाद झाला. मग आयुष बदोनी आणि अब्दुल समद यांनी संघासाठी





## प्रभसिमरन आणि अर्शदीपची चमक

भागीदारी रचली. समद २४ चेंडूत दोन चौकार आणि चार षटकारांसह ४५ धावा करीत बाद झाला. बदोनीने ४० चेंडूत पाच चौकार आणि पाच षटकारांसह ७४ धावांची वादळी खेळी केली. याशिवाय आवेश खानने १० चेंडूत तीन चौकार आणि एका षटकारासह नाबाद १९ धावा केल्या. अशा प्रकारे लखनऊ संघ सात बाद १९९ धावाच करू शकला. पंजाबकडून अर्शदीप सिंगने तीन, अझमतुल्ला ओमरझाईने दोन, तर मार्को यान्सन व चहलने प्रत्येकी एक विकेट घेतली.

तत्पूर्वी लखनऊने नाणेफेक जिंकत पंजाब किंग्सला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले होते. पंजाबच्या फलंदाजांनी विस्फोटक फलंदाजी करत २० षटकांत २३६ धावांचा टप्पा गाठला. प्रियांश आर्य पहिल्याच षटकात बाद झाला, पण प्रभसिमरन सिंग आणि श्रेयस अय्यर यांनी संघाचा डाव सावरला. जोश इंग्लिस १४ चेंडूत एक चौकार आणि चार षटकारांसह ३० धावा करत बाद झाला. यानंतर प्रभसिमरनने ४८ चेंडूत सहा चौकार आणि सात षटकारांसह ९१ धावांची तडाखेबंद खेळी केली. अवघ्या नऊ धावांनी त्याचे शतक हुकले.

कर्णधार श्रेयस अय्यरने २५ चेंडूत २४ चौकार आणि दोन षटकारांसह ४५ धावा केल्या. मग शशांक सिंगने विस्फोटक फलंदाजी करीत १५ चेंडूत चार चौकार आणि एक षटकारांसह ३३ धावा करत संघाला मोठी धावसंख्या गाठण्यात योगदान दिले. लखनऊकडून आकाश सिंग आणि दिग्वेश राठीने प्रत्येकी दोन, तर प्रिन्स यादवने एक गडी बाद केला.

## भर मैदानात फलंदाजाच्या खिशातून पडला मोबाईल!

**लंडन : वृत्तसंस्था**

**व्हिडीओ व्हायरल**



क्रिकेटच्या मैदानात वागण्याचे काही नियम असतात, पण फलंदाज धाव घेत असताना त्याच्या खिशातून मोबाईल खाली पडला. ते पाहून सर्वांनाच धक्का बसला. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

काउंटी चॅम्पियनशिपमध्ये हा प्रकार घडला. लँकेशायरचा गोलंदाज टॉम बेली फलंदाजीसाठी आला. एका चेंडूवर दुहेरी धाव घेण्यासाठी धावताना त्याच्या खिशातून मोबाईल पडला. हे पाहून पंचासह मैदानातील प्रेक्षकही चकीत झाले. टॉम बेलीच्या खिशातून मोबाईल पडल्याचे पाहताच समालोचकांनाही हसू अनावर झाले.

महत्त्वाचे म्हणजे, सामना संपेपर्यंत खेळाडूंना फोन वापरण्याची किंवा खिशात फोन ठेवण्याची परवानगी नाही. स्पॉट फिक्सिंगसारख्या घटना कमी करण्यासाठी नियम अधिक कडक करण्यात आले असताना हा प्रकार घडला. फोन खिशात ठेवल्याबद्दल टॉम बेलीवर काही कारवाई केली जाईल की नाही हे अद्याप समजू शकले नाही. या सामन्यात त्याने ३१ चेंडूत नाबाद २२ धावा केल्या आणि १०व्या क्रमांकावर फलंदाजी करताना लँकेशायरला ४५० धावांपर्यंत पोहचवण्यास मदत केली.


# कोलकाताचा राजस्थानवर थरारक विजय

## रियान परागची झुंज निष्फळ

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये रविवारी झालेल्या पहिल्या सामन्यात कोलकाताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकअखेर चार गडी बाद २०६ धावा केल्या होत्या. राजस्थानने आठ बाद २०५ धावांपर्यंत मजल मारली. कोलकाताने हा सामना केवळ एका धावेने जिंकला.

धावांचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सचा सलामीला फलंदाजीसाठी आलेल्या यशस्वी जैस्वालने चांगली सुरुवात करून दिली. यशस्वीने ३४ धावा केल्या, मात्र त्याला वैभव सूर्यवंशीकडून हवी तशी साथ मिळाली नाही. वैभव



अवघ्या १४ धावांवर तंबूत परतला. कर्णधार रियान परागची बॅट तळपली. हंगामाच्या शेवटी अखेर तो फॉर्ममध्ये परतला. त्याने या डावात ४५ चेंडूत ९५ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने सहा चौकार आणि आठ षटकार खेचले. शेवटी शिमरोन हेटमायरने २९ धावा चोपल्या. हा सामना शेवटच्या चेंडूपर्यंत गेला होता. शेवटच्या चेंडूवर तीन धावांची गरज होती. कोलकाताच्या फलंदाजाने फटका मारला होता, मात्र दुसरी धाव घेत असताना फलंदाज बाद झाला. त्यामुळे कोलकाताने हा सामना केवळ एका धावेने आपल्या नावावर केला.

तत्पूर्वी कोलकाता संघाने २०६ धावांचा डोंगर उभारला. कोलकाताकडून सलामीला फलंदाजीसाठी आलेल्या रहमानुल्लाह गुरबाजने ३५ धावा, तर कर्णधार अजिंक्य रहाणेने ३० धावा केल्या. या डावात इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आलेल्या अंगकृश रघुवंशीने ४४ धावांची आणि आंद्रे रसेलने नाबाद ५७ धावांची खेळी केली.

## प्रभसिमरनची गेल, राहुलच्या विक्रमाशी बरोबरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

प्रभसिमरन सिंगने पंजाब किंग्जच्या डावाची सुरुवात करताना आणखी एक धमाकेदार खेळी केली. लखनऊविरुद्धच्या सामन्यात त्याने ३० चेंडूत अर्धशतकाला गवसणी घातली. या सामन्यात त्याला शतकाची संधी होती, पण नव्वदीच्या घरात पोहचल्यावर तो बाद झाला. शतक हुकले असले तरी अर्धशतकासह त्याने खास विक्रम आपल्या नावे केला आहे.

एकाच हंगामात सलग तीन अर्धशतकासह प्रभासिमरन आता ख्रि गेल आणि लोकेश राहुलच्या पक्तींत जाऊन बसला आहे. या सामन्यात प्रभसिमरन ४८ चेंडूत ९१ धावा करून बाद झाला. या डावात त्याने सहा चौकार आणि सात षटकार मारले. लखनऊविरुद्ध त्याने यंदाच्या हंगामात सलग तिसऱ्यांदा ५०पेक्षा धावा केल्या आहेत. पंजाब किंग्जकडून एका हंगामात सलग तीन सामन्यात ५०पेक्षा अधिक धावा करणारा तो तिसरा सलामीवीर ठरला. याआधी लोकेश राहुल आणि ख्रिस गेलने पंजाबकडून अशी कामगिरी करू दाखवली आहे.

## मोहम्मद शमीला धमकीचा ई-मेल

**लखनऊ : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याला जीवे मारण्याची धमकी देणारा ई–मेल आला आहे. एक कोटी रुपये दे, नाही तर आम्ही तुला मारून टाकू, अशी धमकी शमीला देण्यात आली आहे.

शमी सध्या आयपीएल खेळण्यात व्यग्र आहे. काव्या मारनच्या सनरायजर्स हैदराबाद संघाकडून तो खेळत आहे. धमकीबाबत शमीच्या भावाने उत्तर प्रदेशच्या अमरोहा पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

# ऋषभ पंतच्या हातून बॅटसह विकेटही गेली

**धरमशाला : वृत्तसंस्था**

हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशनच्या धर्मशालाच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात पंजाब किंग्जच्या संघाने सेट केलेल्या २३७ धावांच्या टार्गेटचा पाठलाग करताना लखनऊ सुपर जाएंट्सच्या फलंदाजांनी नांगी टाकली. कर्णधार ऋषभ पंत पुन्हा अपयशी ठरला. त्याची विकेट हा सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

लखनौच्या डावातील आठव्या षटकात पंजाब किंग्जच्या ताफ्यातील अझमातुल्लाह ओमरझाई गोलंदाज करत होता. या षटकातील पाचव्या चेंडूवर



पंत याने मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न केला. हा फटका मारताना बॅट एका बाजूला अन् चेंडू दुसऱ्या बाजूला हवेत उडाला. सुदैवान बॅट पडली त्या दिशेला पंजाबचा कोणताही फिल्डर नव्हता, पण पंतचे दुर्दैव हे की, ज्या बाजूला चेंडू हवेत उडाला तिथे शशांक सिंग होता. त्यानेही कोणतीही चूक न करता पंतचा सोपा झेल टिपला.

विशेष म्हणजे पंत हा आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू आहे. तगडी फटकेबाजी करण्याची क्षमता असलेल्या या विकेट किपर बॅटरसाठी लखनऊच्या संघाने २७ कोटी एवढी रक्कम मोजलीये, पण एक अर्धशतक सोडले तर त्याच्या भात्यातून मोठी खेळी आलेली नाही. पंजाबविरुद्ध पंतने सुरुवात चांगली केली, पण तो बॅटही नीट न धरल्यामुळे विकेट गमावून बसल्याचे पहायला मिळाले.

## वनडे, टी–२०मध्ये टीम इंडिया नंबर वन

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसी म्हणजेच इंटरनॅशनल क्रिकेट काऊन्सिलने वर्षभरातील अपडेटनंतर रँकिंग जाहीर केली आहे, ज्यामध्ये भारतीय संघ वनडे आणि टी–२०मध्ये पहिल्या स्थानी आहे.

वनडेमध्ये न्यूझीलंड संघ दुसऱ्या स्थानी आहे. ऑस्ट्रेलिया वनडे रँकिंगमध्ये दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरली आहे. टी–२०मध्ये ऑस्ट्रेलियाचा संघ दुसऱ्या व इंग्लंड स्थानी आहे. कसोटी क्रमवारीत ऑस्ट्रेलियाचा संघ पहिल्या स्थानी आहे. दुसऱ्या स्थाावर इंग्लंडचा संघ आहे, तर तिसऱ्या स्थानी दक्षिण आफ्रिकेचा संघ आहे.







सस्नेह निमंत्रण

**जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि**
**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल**
**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**



**स्व. जनार्दन भगत साहेब**

यांची ३७वी पुण्यतिथी कार्यक्रम

निमित्ताने शिक्षण, क्रिडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था व व्यक्तिंचा परितोषिक वितरण समारंभ

तसेच पनवेल तालुकास्तरीय

**"स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५"**

**बुधवार, दिनांक ७ मे २०२५ रोजी सायंकाळी ठिक ०६.०० वाजता**
**ठिकाण : रामशेठ ठाकूर मैदान, प्लॉट नं. ६, सेक्टर १२, उलवे नोड**

आपणांस कळविण्यात येते की, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दिनांक ७ मे २०२५ रोजी सायंकाळी ठिक ०६.०० वाजता "स्व. जनार्दन आत्माराम भगत साहेब" यांची ३७ वी पुण्यतिथी कार्यक्रम रामशेठ ठाकूर मैदान, प्लॉट नं.६, सेक्टर १२, उलवे नोड, नवी मुंबई येथे आयोजित केला असून सदर कार्यक्रमासाठी खालील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शुभहस्ते

**मा. आमदार रवींद्रजी चव्हाण साहेब**
कार्याध्यक्ष, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश,
माजी मंत्री, सार्वजनिक बांधकाम, अन्न आणि नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण.

समारंभ अध्यक्ष

**मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब**
माजी खासदार व चेअरमन ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल

प्रमुख पाहुणे

**मा. श्री. प्रशांत ठाकूर**
आमदार – पनवेल विधानसभा तथा
अध्यक्ष, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल

**मा. श्री. महेश बालदी**
आमदार – उरण विधानसभा

**मा. श्री. जे. एम. म्हात्रे**
माजी नगराध्यक्ष, पनवेल

**मा. श्री. महेंद्र घरत**
अध्यक्ष, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी

**मा. श्री. अरूणशेठ भगत**
अध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
तथा अध्यक्ष, पनवेल तालुका भारतीय जनता पार्टी

**मा. श्री. वाय. टी. देशमुख**
उप कार्याध्यक्ष,
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

**मा. श्री. अनिल पांडूरंग भगत**
कार्यकारी मंडळ सदस्य,
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

**मा. श्री. प्रकाश जनार्दन भगत**
कार्यकारी मंडळ सदस्य,
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

**मा. श्री. संजय जनार्दन भगत**
कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल
संचालक, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ,पनवेल

**मा. श्री. वसंत हरी पाटील**
सभासद,
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

रायगड आणि नवी मुंबईमधील तमाम बंधू–भगिनींचे प्रेरणास्त्रोत असणाऱ्या स्वर्गीय जनार्दन आत्माराम भगत साहेबांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण

आपले स्नेहांकित

**श्री. परेश ठाकूर**
सचिव, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल
कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल,
मा. गटनेते, पनवेल महानगरपालिका, पनवेल

**प्राचार्य डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे**
सचिव,
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि सर्व कर्मचारी वृंद श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com